नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. ०४ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# शिंदेंचाही खरातला कॉल!

## ही वृत्ती संपुष्टात आणण्याची भूमिका : दमानियांच्या गौप्यस्फोटावर सामंतांची प्रतिक्रिया

मुंबई : (स. गांवकरी)

नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे सध्या राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या प्रकरणात गंभीर आरोप करताना खळबळजनक माहिती समोर आणली आहे. त्यांच्या दाव्यानुसार, पुराव्यांमध्ये अशोक खरात आणि रुपाली चाकणकर यांच्यात 177 वेळा, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्याला 17 वेळा फोन केल्याचे दिसून येत आहे. हे फोन कॉल नेमके कोणत्या कारणासाठी करण्यात आले, असा थेट सवाल दमानिया यांनी उपस्थित केला असून, त्यांच्या या आरोपांवर आता मंत्री उदय सामंत यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. उदय सामंत म्हणाले, उदय सामंतांनी फोन केलाय का? आता ज्यांचे फोनवर बोलणे झाले,



त्यांनी अशोक खरातच्या कृत्याचे समर्थन केलेले नाही. आता त्याने या नेत्यांशी बोलणे झाल्यावर त्याचा गैरफायदा घेऊन हे कृत्य केले आहे. मात्र ही वृत्ती संपुष्टात आणण्याची भूमिका शिवसेनेची आहे. आमच्या बाजूला येऊन काही लोक फोटो घेतात. मग त्याने काही चुकीचे कृत्य केले तर त्यात आम्ही सामील आहोत का? असा सवाल सामंत यांनी उपस्थित केला. एमएनजीएलकडून हॉटेल व्यावसायिकांना गॅस पुरवठा करण्यास होत असलेल्या दिरंगाईची गंभीर दखल घेत मंत्री उदय सामंत यांनी कडक कारवाईचा इशारा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योजक आणि हॉटेल व्यावसायिकांना सुरळीत गॅस पुरवठा करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तरीही हा तुटवडा जाणीवपूर्वक किंवा कृत्रिमरित्या निर्माण केला जात असल्याचे आढळल्यास सरकार संबंधितांवर कठोर पावले उचलेल, असे सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले. दुसरीकडे, मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक स्तरावर 'लिक्विफाइड नॅचरल गॅस' च्या वाहतुकीत अडथळे निर्माण झाले असून त्याचे सावट पुरवठ्यावर दिसत आहे. या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. त्यानुसार, नागरिकांना दैनंदिन वापरासाठी 100 टक्के सीएनजी गॅस उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत, तर व्यावसायिक वापरासाठी हा पुरवठा 80 टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

# थोडक्यात...

## नर्गिसने मानले राज ठाकरेंचे आभार

मुंबई (स. गांवकरी) : मुंबईतील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर नर्गिस फ्रूटवालाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे आभार मानले आहेत. मनसेने आपल्याला केवळ मदतच केली नाही, तर माणुसकी म्हणून देखील सहकार्य केले. जे पोलिसांनी केले नाही ते मनसेने केले, अशा शब्दात नर्गिसने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असलेल्या नर्गिस फ्रूटवालाचा 4 लाख रुपयांचा कॅमेरा कॅबमध्ये विसरली होती. कॅमेरा विसरल्याचे लक्षात आल्यानंतर तिने संबंधित कॅब चालकाला संपर्क केला. मात्र, चालकाने कॅमेरा परत करण्यास नकार दिल्याचा आरोप नर्गिसने केला. त्यानंतर तिने चेंबूर आरसीएफ आणि एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी कॅब चालकाला कॉल केला, परंतु, आपल्याकडे काहीच नसल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर तिच्या संपर्कात असलेल्या एकाने मनसेची मदत घेण्याचे सुचवले आणि नर्गिस मनसेच्या शाखेत पोहोचली. मनसे वर्सोवा विधानसभा अध्यक्ष संदेश देसाई आणि शाखाध्यक्ष लक्ष्मण वाघमोडे यांनी नर्गिसच्या प्रकरणाची गंभीरपणे दखल घेतली. नवी मुंबई परिसरात त्यांनी त्या कॅब चालकांचा शोध लावला. मनसेच्या कार्यकर्त्यांनी चालकाच्या घराची झडती घेतली आणि कॅमेरा ताब्यात घेतला. अवघ्या 24 तासांतच नर्गिसला तिचा कॅमेरा मिळाल्याने तिने आनंद व्यक्त केला. तसेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे, विभाग अध्यक्ष संदेश देसाई आणि शाखा अध्यक्ष लक्ष्मण वाघमोडे यांचे तिने आभार मानले आहेत.

## आंध्रात रात्री ११ ते २ पर्यंत ५% मतदान

मुंबई (स. गांवकरी) : आंध्र प्रदेशात मध्यरात्री 11 ते 2 वाजेपर्यंत तब्बल 5 टक्के मतदान झाले आहे. असाच फ्रॉड महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतही झाला आहे, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबडेकर यांनी केला आहे. आंबेडकरांनी या प्रकरणी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे पती प्रभाकर यांचा दाखला दिला आहे.

# शेअर मार्केटच्या नादात युवक कर्जबाजारी, आजीला ठार करत सोनं लंपास

## सोलापूर जिल्ह्याला हादरवणारी घटना

सोलापूर : (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात 4 वर्षांपूर्वी मोठा शेअर मार्केट घोटाळा उघडकीस आला होता. विशाल फटे नावाच्या तरुणाने शेअर मार्केटच्या नावाखाली बार्शीकरांना कोट्यवधि रुपयांचा गंडा घातला होता. याप्रकरणी, अद्यापही आरोपी फटे तुरुंगात असून त्याच्या जाळ्यात अडकलेले आर्थिक नुकसानीतून पुढे आले नाहीत. मात्र, तरीही बार्शीत शेअर मार्केटमधून जास्त पैसा कमावण्याच्या नादात स्वत:ला कर्जबाजारी करत आहे. तर, याच कर्जातून मुक्त होण्यासाठी एका तरुणाने चक्क 73 वर्षीय वृद्ध महिलेला स्वत:च्या घरी बोलवून धारधार शस्त्राने खून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असलेल्या गंगुबाई गडदे यांचा शोध लागला, पण अंगावर शहारे आणणारा थरारक शेवट झाल्याची माहिती पोलीस



तपासातून पुढे आली आहे. शशिकांत किसन वायकुळे (वय 64, रा. उपळाई रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, संशयित आरोपी चांगदेव पाटील याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम 103 (1), 238 प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, त्यांची चुलत बहीण गंगुबाई कालीदास गडदे (वय 73, रा. हांडे गल्ली, कचेरी रोड, बार्शी) या एकट्याच राहत होत्या.

# अमेरिकेला धक्का, F-35 विमान पाडल्याचा इराणचा दावा

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध आणखी तीव्र होत आहे. इराणनं अमेरिकेच्या दुसऱ्या पाचव्या व्हर्जनच्या स्टील्थ F-35 लढाऊ विमानाला यशस्वीपणे पाडल्याचा दावा केला आहे. यासह अमेरिकेचा विमानाचा पायलट पकडल्याचा दावा देखील इराणनं केला आहे. इराणच्या सरकार आणि निमसरकारी वृत्तवाहिन्यांनी अधिकाऱ्यांच्या हवाल्यानं म्हटलं की पायलट जिवंत असण्याची शक्यता कमी आहे. तर, काही रिपोर्टनुसार एफ-35 विमानाच्या पायलटला जिवंत पकडण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे. काही वृत्तांनुसार अमेरिकेनं विमान पडल्यानंतर हेलिकॉप्टर पाठवून पायलटची सुटका करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना यश आलं नसल्याची माहिती आहे. इराणच्या तस्लीम वृत्तसंस्थेच्या रिपोर्टनुसार, इराणच्या इस्लामिक रिवोल्यूशनरी गार्ड कॉर्प्सनं 3 एप्रिलला अमेरिकेच्या अत्याधुनिक लढाऊ विमानाचा पाडाव केला असून पायलट विमानावरील हल्ल्यानंतर इराणमध्येच उतरल्याचं म्हटलं.




दुसरीकडे मेहर न्यूज एजन्सीनं म्हटलं की अमेरिकेला वाटत असेल, पायलट जीवंत असेल आणि ते पायलटला इराणच्या सीमेबाहेर काढण्याचा प्रयत्न करत असतील. मात्र, काही सूत्रांच्या मते इराणी सैन्यानं पायलटला पकडलं आहे. इराणच्या प्रेस टीव्ही रिपोर्टनुसार, आयआरजीसीच्या सेंट्रल मिलिट्री हेडक्वार्टर खातम अल- अनबियाचे प्रवक्त्यांनी म्हटलं की, आयआरजीसीच्या हवाई दलानं नव्या एअर डिफेन्स सिस्टीमद्वारे अमेरिकेच्या आणखी एका पाचव्या पिढीच्या F-35 स्टील्थ लढाऊ विमानाला पाडलं आहे. या हल्ल्यादरम्यान झालेल्या स्फोटामुळं पायलट त्यातून बाहेर पडल्याची शक्यता कमी आहे असं म्हटलं.






# थोडक्यात पण महत्वाचे





## ओतूर : मोनिका चौकात भीषण अपघात; तरुण विवाहितेचा मृत्यू

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ओतूर (ता. जुन्नर) येथील मोनिका चौकात शुक्रवार दि:-३ सकाळी सुमारे साडे अकरा वाजण्याच्या सुमारास ट्रक व स्कुटी यांच्यात झालेल्या भीषण धडकेत एका तरुण विवाहितेचा दुर्दैवी मृत्यू झाला. स्नेहल रवींद्र अहिनवे वय २८,रा:-अहिनेवाडी ता:-जुन्नर असे घटनास्थळी ठार झालेल्या स्कुटी चालक तरुणीचे नाव आहे.मिळालेल्या माहिती नुसार ट्रक आणि स्कुटी यांच्यात मोनिका चौकात जोरदार धडक झाली.ही धडक इतकी जबरदस्त होती की स्कुटीवरील तरुण चालक महिलेचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पोलीस हवालदार भारती भवारी,शामसुंदर जायभाये, किशोर बर्डे,धनंजय पालवे, विश्वास केदार तसेच ट्रॅफिक वॉर्डन शुभम काशीद यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली व पंचनामा करण्याची कार्यवाही सुरू केली. या घटने मुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून पुढील तपास ओतूर पोलीस करीत आहेत.

## परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी उपमहापौर वाडेकर उतरले रस्त्यावर



पुणे (स. गांवकरी) : अवकाळी पावसाने सलग दोन दिवस पुणेकरांना झोडपले असून एप्रिल महिन्यातील सर्वाधिक पावसाचा तब्बल 130 वर्षांचा विक्रम या दोन दिवसाच्या पावसाने मोडून काढला आहे. यामुळे घडलेल्या झाडपडीसारख्या, रस्त्यावर पाणी साचणे आणि ड्रेनेज तुंबण्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. रस्त्यांना ओढ्या नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले. अनेक नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरले. कचराकुंड्यांमध्ये पाणी जाऊन कचऱ्याचा चिखल झाला. ही निर्माण झालेली परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी खुद्द उपमहापौर परशुराम वाडेकर रस्त्यावर उतरले. कमी कालावधीमध्ये जोरदार वाऱ्यांसह शहरात वादळी पाऊस झाला. तुफान पावसामुळे अनेक ठिकाणी ड्रेनेज तुंबण्याचे प्रकार घडले. या विषयीच्या अनेक तक्रारी उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्याकडे येवू लागल्या. या परिस्थितीत वेगाने कामे करून परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी स्वतः रस्त्यावर उभे राहून महापालिकेचा उद्यान विभाग, सफाई कर्मचारी यांना सूचना देवून यांच्यामार्फत वेगाने कामे मार्गी लावली. या विषयी माहिती देताना वाडेकर म्हणाले, या पावसामुळे ज्या ठिकाणी ड्रेनेज तुंबळे, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी साठणे असे प्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहेत. तसेच घरात पाणी शिरण्याचे प्रकार घडले अशा सर्व ठिकाणांची नोंद घेण्यात आली असून या पुढील पावसाळ्यात किंवा अवकाळी पावसाच्या वेळी नागरिकांना पुन्हा या त्रासाला सामोरे जावे लागू नये यासाठी लवकरात लवकर प्रभावी उपाययोजना करण्यात येतील, असे वाडेकर यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले, बोपोडी परिसरातील पठाण चाळ बोपोडी 53, 54 हायवे जवळील वसाहत, बोपोडी सर्वे क्रमांक 26 येथील तक्रारी काढून घेण्यात आल्या आहेत. विविध ठिकाणाचा कचरा काढून घेण्यात आला आहे. त्यामध्ये मटन मार्केट, दूध भट्टी, मारुती मंदिर परिसर व औंध रोड परिसरात असे अनेक ठिकाणी मधील कचरा काढून स्वच्छ करून घेण्यात आले.असेही वाडेकर यांनी सांगितले.

## इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमध्ये कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह; ३८ विद्यार्थ्यांची निवड

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : बेलवंडी (शुगर) येथील इंदिरा गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालयात नुकत्याच आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये एकूण ३८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या उपक्रमासाठी तळेगाव दाभाडे येथील अभिजीत इंजिनियर्स कंपनीचे प्रोडक्शन हेड मदन चव्हाण व एचआर हेड उत्तम पवाडे उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर साळवे सर, मेकॅनिकल विभागप्रमुख हवालदार सर, सिव्हिल विभागप्रमुख नातू सर, कॉम्प्युटर विभागप्रमुख इथापे सर तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागप्रमुख शिंदे सर यांची उपस्थिती होती.प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये विविध विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यापैकी मेकॅनिकल विभागातील १९ व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील १९ अशा एकूण ३८ विद्यार्थ्यांची निवड झाली. या यशस्वी प्लेसमेंट ड्राईव्हमुळे महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, प्रशिक्षण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांची तयारी यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांना उद्योगांसाठी सक्षम करण्यासाठी घेतलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, संचालक मंडळ, निरीक्षक सचिनराव लगड, प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सहभागी कंपनी व एचआर प्रतिनिधींचे आभार मानले.

## दिव्यात सर्वंकष स्वच्छता मोहिमेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका हद्दीतील सर्वच प्रभाग समिती हद्दीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. आज दिवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक 33 मध्ये सर्वंकष स्वच्छता मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आली. सर्वंकष स्वच्छता मोहीम ही फक्त ठाणे शहरात मर्यादित न राहता ती महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक प्रभागात राबविली गेली पाहिजे या हेतूने महापौर पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी प्रत्येक आठवड्यात प्रभाग क्रमांक 1 ते प्रभाग 33 या ठिकाणी ही मोहीम राबविताना ठाणे शहर, दिवा, मुंब्रा, कळवा अशा पद्धतीने राबविण्याच्या सूचना घनकचरा व्यवस्थापन विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार आज दिवा प्रभाग समिती 33 अंतर्गत वाय जंक्शन ते कौसा तलाव तसेच चरणी पाडा रोड व परिसर येथे सर्वकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

# लाखो भाविकांच्या साक्षीने सप्तश्रृंग गडावर कीर्तिध्वज डौलात

(स. गांवकरी)



महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी आद्य स्वयंभू शक्तीपीठ असलेल्या सप्तशृंगगडावर चैत्र यात्रेनिमित्त भाविकांची अभूतपूर्व गर्दी उसळली असून गेल्या तब्बल ३६ ते ४८ तासांपासून दर्शनासाठी सलग रांगा लागल्या आहेत. लाखो भाविकांनी आई सप्तश्रृंगीचे दर्शन घेतले असून बुधवारी मध्यरात्री देवीच्या शिखरावर पारंपरिक पद्धतीने भगव्या रंगाचा कीर्तिध्वज डौलात फडकविण्यात आला. या भव्य सोहळ्याने संपूर्ण गड भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. शेकडो मैलांचा प्रवास, तळपते ऊन आणि शारीरिक कष्टांची पर्वा न करता भाविक भगवतीच्या दर्शनासाठी मोठ्या श्रद्धेने गडावर दाखल झाले. मंदिर परिसर, चढण पायऱ्या तसेच संपूर्ण गावातील विविध भागात दर्शनासाठी लांबच लांब बाऱ्या लागल्या होत्या. उत्तर महाराष्ट्र तसेच खान्देश भागातून भाविक आणवाणी पावलांनी गडावर पोहोचल्याचे दिसून आले.

ढोल-ताशांच्या गजरात अलंकारांची मिरवणूक; पंचामृत महापूजा संपन्न.... बुधवारी सकाळी ७.३० वाजता देवीचे अलंकार विश्वस्त संस्थेच्या कार्यालयातून ढोल-ताशांच्या गजरात मंदिराकडे मिरवणुकीद्वारे नेण्यात आले. या वेळी वातावरण भक्तिमय झाले होते. श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टचे विश्वस्त ॲड. ललित निकम यांनी सह पत्नीक श्री भगवतीची पंचामृत महापूजा केली. चैत्र यात्रेच्या कालावधीत काकड आरती, महानैवेद्य आरती, पंचामृत महापूजा आणि सांज आरती असे विविध धार्मिक विधी नियमितपणे सुरू असून दररोज हजारो ते लाखो भाविकांची उपस्थिती नोंदवली जात आहे. कीर्तिध्वजाच्या मिरवणुकीत जयघोषाने गड दुमदुमला दुपारी ३.३० वाजता श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या मुख्य कार्यालयातून कीर्तिध्वजाची विधिवत पूजा करून पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली. ट्रस्टच्या अध्यक्षा तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती कल्पना के. पाटील, तहसीलदार रोहिदास वारुळे,विश्वस्त मंडळातील प्रतिनिधी ॲड. ललित निकम, मनज्योत पाटील, कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, पोलिस उपअधीक्षक वासुदेव देसले, पोलिस निरीक्षक खगेन्द्र टेंभेकर, पोलिस पाटील शशिकांत बेनके, ध्वजाचे मानकरी सोमनाथ गवळी, एकनाथ गवळी, काशिनाथ गवळी, गवळी परिवार यांच्यासह पोलीस व प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि "सप्तश्रृंगी माता की जय", "परशुराम बाला की जय", "मार्कंडेय महाराज की जय" अशा जयघोषात ही मिरवणूक पहिल्या पायरीपर्यंत नेण्यात आली. लाखो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

सायंकाळी श्री भगवती मंदिरात दर्शन घेऊन गवळी पाटील मध्यरात्री शिखरावर चढाई करतात. समुद्रसपाटीपासून सुमारे ४६५९ फूट उंचीवर असलेल्या या शिखरावर जाण्यासाठी कोणताही निश्चित मार्ग नसतानाही ही परंपरा वर्षानुवर्षे अखंड सुरू आहे.

### प्रशासन व सेवाभावी संस्थांची सज्जता

गर्दीचा वाढता ताण लक्षात घेता पोलिस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला असून गर्दी नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत. नाशिक ग्रामीण पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक, स्वयंसेवक तसेच विविध संस्थांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर सेवेत कार्यरत आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी धर्मार्थ रुग्णालय, मराठा विद्या प्रसारक समाज, गुरुकृपा हॉस्पिटल (दिंडोरी), तसेच आरोग्य पथके व ॲम्ब्युलन्स सेवा २४ तास सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. विश्व मानव रोहानी केंद्राच्या वतीने मोफत महाप्रसाद व भोजन व्यवस्था सुरू आहे.गड भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला...चैत्रोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण सप्तश्रृंगगड भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला असून लाखो भाविकांच्या उपस्थितीत सर्व धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडत आहेत. यंदाही विक्रमी गर्दीमुळे सप्तश्रृंगगडावरील चैत्र यात्रा ऐतिहासिक ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## पिकल बॉल कोर्टचे उद्घाटन; नवे क्रीडांगण खुले

ठाणे : (स. गांवकरी)



शहरात झपाट्याने लोकप्रिय होत असलेल्या पिकल बॉल या खेळाला चालना देण्यासाठी ठाणे पूर्व भागात नव्याने उभारण्यात आलेल्या पिकल बॉल कोर्टचे भव्य उद्घाटन आमदार संजय केळकर आणि कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते पार पडले. पीपल एज्युकेशन सोसायटी आणि द्रोणाचार्य क्रीडा अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. ठाण्यात यापूर्वी काही खाजगी पिकल बॉल कोर्ट उपलब्ध असले, तरी सर्वसामान्य खेळाडूंना सहज उपलब्ध होईल असे हे पहिलेच महत्त्वाचे कोर्ट मानले जात आहे. ठाणे पिकल बॉल असोसिएशनच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या या उपक्रमामुळे खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळणार आहेत. उद्घाटन सोहळ्याला क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. पीपल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विद्याधर वैशंपायन, सचिव आल्हाद जोशी, ठाणे पिकल बॉल असोसिएशनचे अध्यक्ष मनोहर डुंबरे, सचिव सचिन मोरे, ॲड. सुभाष काळे, संस्थेचे संचालक श्री. भोळे, श्री. तुरुकमाने तसेच सौ. मेधा भंडारी यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाणी टंचाईवर हार्वेस्टिंग प्रोजेक्टमुळे होणार मात

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



जुन्नर-तालुक्यातील पश्चिम अतिदुर्गम आदिवासी भागातील चिंचेवाडी व देवळे या गावांमध्ये पाणीटंचाईवर मात करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या वॉटर हार्वेस्टिंग प्रोजेक्टला चांगली गती मिळाली आहे.ग्रामपंचायत, पंचायत समिती जुन्नर आणि चाइल्डफंड इंडिया यांच्या संयुक्त सहकार्याने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सध्या अंतिम टप्प्यात पोहोचला असून सुमारे ८०

टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामही लवकरच पूर्ण होणार असल्याची माहिती संबंधितांकडूनदेण्यात आली. दरवर्षी मार्च ते जून या उन्हाळी महिन्यांत या दोन्ही गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत होती.विहिरी कोरड्या पडणे, टँकरवर अवलंबून राहावेलागणे आणि जनावरांसाठी पाणी मिळण्यात अडचणी येणे,अशा समस्यांचा ग्रामस्थांना सामना करावा लागत होता. या वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पामुळे पावसाचे पाणी साठवून त्याचा योग्य वापर करण्याची सुविधा निर्माण होत आहे.या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे ६०० ते १००० नागरिकां ना थेट फायदा होणार असून गावातील पाणीपुरवठा अधिक सक्षम होणार आहे.यामुळे शाळांतील विद्यार्थ्यां, युवकांना, महिला वर्गाला तसेच जनावरां नाही पाण्याची उपलब्धता सुलभहोणार आहे. परिणामी गावातील एकूणच पाणी व्यवस्थापन सुधारण्यास मोठी मदत होणार आहे. ग्रामपंचायत,पंचायत समिती आणि चाइल्डफंड इंडिया यांच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम केवळ पाणीपुरवठा सुधारण्या साठीच नव्हे तर ग्रामस्थांमध्ये पाणी बचत व संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठीही महत्त्वाचा ठरत आहे.भविष्यात पाण्याचा योग्य वापर आणि बचत संवर्धन यासाठी हा प्रकल्प आदर्श ठरेल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या प्रकल्पाची कामे दर्जेदार वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी चाईल्ड फंड इंडिया मढ संस्थेचे वरीष्ठ प्रकल्प अधिकारी अभिजित मदने व अजित सोर यांच्या मार्गदर्शना खाली टीम आणि फील्ड टीम कडूननियमित पाहणी केली जात आहे. नियममितपणे पाहणीच्या माध्यमातून कामाचा आढावा घेतला जात असून आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन केले जात आहे.विशेष म्हणजे, या उपक्रमात स्थानिक ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत असून गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येत काम करण्याचा सकारात्मक संदेश दिला जात आहे. एकूणच चिंचेवाडी व देवळे गावांमध्ये सुरू असलेला वॉटर हार्वेस्टिंग प्रोजेक्ट हा शाश्वत जलसंधारणा चा आदर्श नमुना ठरत असून भविष्यातील पाणी टंचाईवर प्रभावी उपाय म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे.

## जुन्नर येथील विद्यालयास जलशुद्धीकरण यंत्र व स्मार्ट बोर्ड भेट

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)





जुन्नर येथील आदिवासी शिक्षण संस्थेच्या कृष्णराव मुंढे विद्यालयास सामाजिक बांधिल कीतून मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक साहित्याची मदत प्राप्त झाली आहे. युनायटेड रबर इंडस्ट्रीज यांच्या CSR निधीतून व डिसेंट फाउंडेशन,पुणे यांच्या माध्यमातून पाच लाख रुपये किमतीचे 'जलशुद्धीकरण यंत्र' आणि कंडक्टर वॅम्पफलर लि. (चाकण) यांच्या वतीने ७.५ लाख रुपये किमतीचे पाच 'स्मार्ट बोर्ड'विद्यालयास प्रदान करण्यात आले.या अत्याधुनिक साहित्याचे उद्घाटन विद्यालया तील गुणवंत विद्यार्थ्यांच्या शुभहस्ते करण्यात आले,जे या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. आरोग्य आणि शिक्षणाचा संगम याप्रसंगी बोलताना डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई म्हणाले की,"ग्रामीण व दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी मिळाल्यामुळे त्यांचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल. तसेच,स्मार्ट बोर्डच्या वापरामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढून ते आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जातील."मान्यवरांची उपस्थितीकार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमलताई शेळकंदे होत्या. त्यांनी आपल्या भाषणात शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले व भविष्यात शाळेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व पायाभूतसुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमास खालील देवराम मुंढे:- सेक्रेटरी आदिवासी शिक्षण संस्था, सुरेखाताई मुंढे अध्यक्षा,अमित ढोले:- उपसभा पती,पंचायत समिती,सचिन मुंढे नायब तहसीलदार, जितेंद्र बिडवई:- संस्थापक, डिसेंट फाउंडेशन,डॉ. एफ.बी.आतार सचिव, तसेच माजी नगरसेवक मधुकर काजळे,ॲड. निवृत्ती घोडके, नगरसेवक मंदार बुट्टे पाटील, राजश्री खोंड, ज्योत्स्ना मुंढे, संतोष घोगरे, राजाराम बोऱ्हाडे आणि ह.भ.प.लक्ष्मण महाराज, नियोजन मुख्याध्यापक देवराम पोटकुले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदीप जुगदर, विनायक पानसरे,कविता साबळे, शितल वाघ व सचिन डेरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत घुले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अर्चना खोसे यांनी मानले.

## अंकिता पाटील-ठाकरे यांची व सभापतीपदी निवड

इंदापूर : (स. गांवकरी)



बावडा लुमेवाडी गटाच्या पुणे जिल्हा परिषद सदस्या अंकिता पाटील-ठाकरे यांची पुणे जिल्हा परिषदेत महिला व बालकल्याण सभापतीपदी त्यांची (दि. 2एप्रिल ) निवड झाल्याने बावडा परिसरात पाटील समर्थकांच्या वतीने जल्लोष करण्यात आला आहे. अंकिता पाटील - ठाकरे या माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या असून त्यांनी बावडा परिसरात आपल्या कार्यशैली आणि जनसंपर्काच्या जोरावर राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील बावडा गटातून पुणे जिल्हा जिल्हा परिषदेवर मोठ्या संख्येच्या मताने निवडून गेल्या आहेत. त्यांना पक्षाने संधी दिले असून पुणे जिल्हा परिषदेत महिला व बालकल्याण सभापतीपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्यानिवडीमुळे हर्षवर्धन पाटील समर्थक आणि बावडा गटात उत्साहाचे वातावरण असून त्यांचे विशेष अभिनंदन होत असताना दिसून आले.

# आज दै. समर्थ गांवकरीचा मेळावा

### मान्यवरांचा सन्मान व 'टॉप टेन पत्रकारिता' पुरस्कार वितरण ४ एप्रिलला!






(स. गांवकरी)

कोकमठाण (कोपरगाव) : महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान तसेच उत्कृष्ट "टॉप टेन पत्रकारिता पुरस्कार" वितरण सोहळा यावेळी होणार आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता आत्मा मलिक ध्यानपीठ, समृद्धी महामार्ग शेजारी, कोकमठाण (ता. कोपरगाव) येथे आयोजित करण्यात आला आहे. दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार–२०२६ संत परमानंद महाराज (आत्मा मलिक ध्यानपीठ, कोकमठाण) यांना प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमात संपादक, उपसंपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहरांचा सन्मान, ओळखपत्र व विविध साहित्य वितरण तसेच मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास बिग बॉस फेम दिव्या शिंदे (सरकार सेना संघटना अध्यक्ष व प्रसिद्ध इंस्टाग्राम इन्फ्लुएंसर), डॉ. नानजीभाई ठक्कर (ठाणावाला), समूह संपादक, डॉ. विश्वासराव आरोटे (संपादक, दैनिक समर्थ गांवकरी), नवनाथ जाधव (कार्यकारी संपादक), दशरथ चव्हाण (संपादक व नवी मुंबई जिल्हाध्यक्ष, म.टा.प.संघ, मुंबई) तसेच संजय फुलसुंदर (व्यवस्थापक, दै. समर्थ गांवकरी) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असून बिग बॉस फेम दिव्या शिंदे यांना "राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्कार – २०२६", मा. संतोष देविदास कोकणे यांना "समाजसेवा पुरस्कार – २०२६", मा. वर्षाताई चौधरी (लहित, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) यांना "उद्योजिका पुरस्कार – २०२६" तसेच मा. सुनिलशेठ डांगरा (अकोले, जि. अहिल्यानगर) यांना "उद्योजक पुरस्कार – २०२६" प्रदान करण्यात येणार आहेत.

याशिवाय "टॉप टेन पत्रकारिता पुरस्कार" अंतर्गत मा. चंद्रकांत कोळी (रावेर, जि. जळगाव), मा. रविंद्र भोर (जुन्नर, जि. पुणे), मा. दत्तात्रय राऊत (जामखेड, जि. अहिल्यानगर), मा. राजेश डोके (शिवनेरी, ता. जुन्नर), मा. रविंद्र आहेर (कळवण, जि. नाशिक), मा. फयाक अली सय्यद (खर्डा, ता. जामखेड), मा. दशरथ चव्हाण (नवी मुंबई), मा. संतोष पडवळ (ठाणे), मा. अनिल धमने (नांदेड),मा. सुभाष विशे (शहापूर, जि. ठाणे) आणि पत्रकार राजू टपाल यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या मेळाव्यास संपादक, प्रतिनिधी, वार्ताहर तसेच पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने करण्यात आले आहे.


Technical Campus Akole -
M.B.A; M.C.A.
Faculty of Polytechnic -
Civil Engineering
Computer Engineering,
Electronics & Tele-Comm;
Mechanical Engineering
Agasti Arts, Commerce &
D.R.Science College Akole.
B.B.A; B.C.A; B.C.S;
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, अकोले
दै.समर्थ गांवकरी वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
दै.समर्थ गांवकरी वर्धापन दिवस हार्दिक शुभेच्छा!
श्री.सुनिल दातीर अध्यक्ष
श्री.सुधाकरराव देशमुख सचिव
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले
- मा.विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकारी सदस्य -
श्री.सुरेश कोते (स्विकृत विश्वस्त)
श्री.धनंजय संत (खजिनदार)
श्रीमती कल्पनाताई सुरपूरीया (सदस्य)
श्री.रमेश जगताप (सदस्य)
श्री.मधुकर सोनवणे (स्विकृत विश्वस्त)
श्री.दामोदर सहाणे (सदस्य)
श्री.सुधाकर आरोटे (सदस्य)
श्री.शरद देशमुख (सदस्य)
श्री.संपत मालुंजकर (शिक्षणाधिकारी)
श्री.संपत वैद्य (स्विकृत विश्वस्त)
श्री.यशवंत आभाळे (सदस्य)
श्री.आनंदराव नवले (सदस्य)
श्री.मच्छिंद्र धुमाळ (सदस्य)


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
दैनिक समर्थ गांवकरी
वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छूक -
इंजि. सुजित रहाणे
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
मु.पो.अकोले, ता.अकोले, जि.अ.नगर


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी वर्धापन दिन
कु.सुमित सुभाष विशे
मा.श्री.सुभाष विशे
ठाणे जिल्हा उपाध्यक्ष
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई
दै.गांवकरी ठाणे ग्रामीण जिल्हा प्रतिनिधी
हार्दिक शुभेच्छा
सुमीत कन्स्ट्रक्शन
प्रोप्रा. श्री.सुभाष रामा विशे
मोबा.९६३७२२०८८८ / ९२८४३४२८२८
मु.पो.वासिंद, ता.शहापूर, जि.ठाणे


मा.शेखर हनुमंत गोल्हार
मा.दिपक राजा गोल्हार
मा.कृष्णा पाटील उर्फ लक्ष्मण गुड्डील
दै.समर्थ गांवकरी वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
सामाजिक कार्यकर्ते
ह.मु.ठाणे
मु.पो.हनुमंत, १३९६, इंदिरानगर,
अंकाली,बेळगाव (कर्नाटक) ५९१२१३


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
www.egavkari.com
समर्थ गांवकरी NEWS Channel
AVP NEWS Channel
महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा
संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
प्रदेश सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
मु.पो.अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर मोबा.९४२३३८८५०८/९४२३४६७२७२



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा
मा. दत्तात्रय राऊत
तालुका अध्यक्ष, जामखेड
मा. फयाकअली सय्यद
जिल्हा निवड समिती अध्यक्ष, म.रा.प.संघ
पत्रकार, दै. समर्थ गांवकरी


दै.समर्थ गांवकरी वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा
:- शुभेच्छूक :-
सत्यनिकेतन संस्था, राजूर
ता.अकोले, जि. अहिल्यानगर
मा.ॲड.एम.एन.देशमुख अध्यक्ष
मा.श्री.टी.एन.कानवडे सचिव
मा.श्री.मारुती मुठे विश्वस्त
मा.श्री.विवेक मदन कोषाध्यक्ष
सन्मा.संचालक मंडळ
मा.श्री.प्रकाशशेठ शहा, मा.श्री.मिलींद उमराणी,मा.श्री.एस.टी.येलमामे,
मा.श्री.प्रकाश टाकळकर, मा.श्री.रामशेठ पन्हाळे, मा.श्री.विजय पवार
मा.श्री.नंदकिशोर बेल्हेकर, व्यवस्थापक : मा.श्री.प्रकाश महाले


























हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे




## महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

राजगुरुनगर (स. गांवकरी) : खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात 'बारावी नंतरचे करिअर' या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या बाफना रंगमंदिराच्या सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी बारावीचे विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या संचालिका उर्मिलाताई सांडभोर, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, प्राचार्या संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख दशरथ पिलगर, पर्यवेक्षक लतीफ शाह, सुनीता ठाकूर, संदेश जाधव उपस्थित होते. करिअर मार्गदर्शक व समुपदेशक विवेक वेलणकर म्हणाले की मेडिकल व इंजिनिअरिंग शिवाय बारावी शास्त्र शाखेनंतर अनेक अनेक पर्याय उपलब्ध आहेत. पशुवैद्यक, आर्किटेक्चर, बायोटेक्नॉलॉजी, संशोधन क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, ॲग्रिकल्चर, फार्मसी, गणित व संख्याशास्त्र या क्षेत्रांमध्येही उत्तम करिअर होऊ शकते. पालक व विद्यार्थ्यांनी अशा परीक्षा व अभ्यासक्रमाची माहिती घेऊन आपल्या पाल्याच्या दृष्टीने ध्येय निश्चित करावे. पर्यवेक्षक संदेश जाधव यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. माधुरी हुंडारे यांनी सूत्रसंचालन केले. दीपक वाळुंज यांनी आभार मानले. शीला नाईकरे यांनी संयोजन केले.

## महिलांकडे एकटक पाहिल्याने जिम ट्रेनरला बेदम मारहाण

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिममध्ये व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या महिलांकडे एकटक पाहिल्याचा जाब विचारल्यामुळे एका जिम ट्रेनरला बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना शहरात घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पोलीस दलातील अंकुश जाधव आणि विवेक आहिरे यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी सदाम हुसेन इद्रीस शेख हे कोहिनूर मॉल येथील एका जिममध्ये व्यवस्थापक आणि प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या जिममध्ये येणाऱ्या काही महिला सदस्यांनी आरोपींच्या वर्तनाबाबत तक्रार केली होती. यावरून शेख यांनी अंकुश जाधव याला समजावण्याचा प्रयत्न केला असता, त्याने वर्दीचा माज दाखवत शेख यांना खोटी कारवाई करण्याची धमकी दिली.

## मालापारायण महोत्सव सुरू




अहिल्यानगर (स. गांवकरी) : प्राचीन ज्ञानाचे रक्षण व प्रसार करण्याच्या उद्देशाने आळंदी येथील आध्यात्मिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने आयोजित शुक्लयजुर्वेद माध्यंदिन शाखा माला पारायण महोत्सव शुक्रवारपासून सुरू झाला असून हा महोत्सव १० एप्रिल पर्यंत सकाळी ८ ते ११ या वेळेत पुण्यातील लक्ष्मी रस्त्यावरील बेलबाग संस्थानचे श्री विष्णू मंदिरात पार पडत आहे. दोन पदांचा क्रम त्याच दोन पदांचा व्युत्क्रम म्हणजे उलट म्हणणे पुनश्च: पूर्ववत क्रम उच्चारणे यालाच संक्रम असे म्हणतात त्यानंतर प्रथम पद सोडून द्वितीय पद जोडून क्रमशः क्रम, व्युत्क्रम,संक्रम या क्रमाने पदांची पुष्प माला गुंफणे यालाच मालापारायण असे म्हणतात. सौष्ठवौदार्ययुक्त विशेषशालिनी अशी वाणी व लोकोत्तरविलक्षण मेधाशक्ती यांच्या समन्वयामुळे सिध्द होणारे हे माला पारायण आहे. पारायणे मधल्या काही काळात खंडीत झाली होती. त्या पारायणांची पुनश्च सुरुवात कै. विश्वनाथ केशव जोशी यांनी केली होती. त्यांची पूर्तता त्यांचा मुलगा वेदमूर्ती विवेक जोशी हे करीत आहेत.तसेच पारायणाचे निरीक्षत्व सुप्रसिद्ध घनपाठी वे.मू. किरण पाठक करत आहेत. या वेदश्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन न्याय शास्त्र चुडामणी अशोक शास्त्री कुलकर्णी यांनी केले आहे. दि.१० एप्रिल रोजी सकाळीच ८ वाजता भव्य मिरवणूक निघणार आहे व पुणे येथील केसरीवाडा येथे सकाळी १० ते दुपारी ३ सत्कार समारंभ होणार आहे. अशी माहिती वे. शा.सं.सागर कुलकर्णी गुरुजी यांनी दिली आहे.

## मन्नेरवारलू वधू वर परिचय मेळाव्याच्या नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

बिलोली (स. गांवकरी) : मे महिन्यात बिलोलीमध्ये पहिल्यांदाच भव्य जिल्हास्तरीय मन्नेरवारलू वधूवर परिचय मेळावा आयोजित केला जाणार आहे. यात महाराष्ट्र राज्यातून पुणे, औरंगाबाद, जालना तसेच इतर जिल्ह्यातून नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे बिलोली तील मन्नेरवारलू समाजातील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमूर्गे यांनी म्हटले आहेत. या मेळाव्यात विशेषतः समाजाच्या विविध घटकांच्या वधू-वरांचा सहभाग होईल. तेलंगणा राज्यातील वधू वर उपस्थित राहणार असून दोन राज्यातील नाते अधिक घट्ट होणार असल्याचे सांगितले आहेत. अशा प्रकारचे परिचय मेळावे विवाहाच्या योग्य जोडीदाराची निवड करण्यास मदत करतात. सर्व समाज बांधवांचे योगदान व सहकार्याने नांदेड जिल्ह्यातून उपवधू - वर नोंदणीचा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यासाठी मन्नेरवारलू समाजातील सर्व शिक्षित, उच्चशिक्षितांसह विविध क्षेत्रातील मुला मुलींना अनुरूप जोडीदार शोधण्यासाठी त्यांच्या पालकांनी विवाह इच्छुकांच्या परिचय पत्रासह पूर्व नोंदणी बिलोली शहरातील अनेक ठिकाणी नोंदणी करता येणार असल्याचे आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी म्हटले आहेत. यांच्या संकल्पनेतून बिलोली मध्ये प्रथमच समाजातील ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शना खाली जिल्हास्तरीय मेळाव्याचं आयोजन होणार आहे. ज्यात वधू-वरांची एकमेकांना परिचय करुन देण्याची संधी मिळणार असल्याचे आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केले आहेत. 2026 या वर्षासाठी नाव नोंदणी सुरू आहे.

## सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब चौदंते यांचे निधन



मुदखेड (स. गांवकरी) :भिमनगर मुदखेड येथील रहिवासी हा.मु. नांदेड येथे स्थायिक असलेले सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब माधव चौदंते (वय ६२ वर्षे) यांचे बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दि. २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता मुदखेड येथील बौद्ध स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. बाबासाहेब चौदंते हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या निधनाने चौदंते परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन बहिणी आणि चार भाऊ असा मोठा परिवार आहे. ते मुख्याध्यापक राजकुमार चौदंते, सामाजिक कार्यकर्ते मोहन चौदंते, जयप्रकाश चौदंते आणि कपिल चौदंते यांचे मोठे बंधू होत.

# व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला

## घटना सीसीटीव्हीत कैद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



शहरातील लालटाकी परिसरात रिक्षा चालकाने अचानक यू टर्न घेतल्यामुळे दुचाकी रिक्षाला धडकून झालेल्या अपघातानंतर वाद होऊन कापड बाजार येथील व्यापारी दीपक नवलानी यांच्यावर जमावाने हल्ला करत त्यांना मारहाण केली. १ एप्रिल रोजी दुपारी चार ते साडेचार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. जखमी नवलानी यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघात व त्यानंतर मारहाणीची घटना सीसीटीव्हीत कैद झाली. तीन वर्षांपूर्वी नवलानी यांच्यावर बाजारपेठेत चाकू हल्ला करण्यात आला होता.

याबाबत जखमी नवलानी यांच्या पत्नी सौ. कनक नवलानी यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या मुलासोबत मोपेडवर दातांच्या दुखण्याबाबत रुग्णालयात जात होत्या. अप्पू हत्ती चौकात त्यांच्या पुढे एका रिक्षा चालकाने अचानक यु टर्न घेतल्याने त्यांची मोपेड रिक्षावर आदळली. याचा जाब रिक्षा चालकाला विचारला असता तो उद्धटपणे बोलू लागला. त्यानंतर तेथे एक तरुण मोटारसायकल वर आला आणि त्यानेही फिर्यादी सोबत गैरवर्तन केले. त्यामुळे फिर्यादी यांनी त्याचे पती दीपक नवलानी यांना फोन करून सांगितले. ही माहिती मिळताच नवलानी तातडीने तेथे गेले. त्यांनी रिक्षाचालक व त्या अनोळखी तरुणाला जाब विचारला असता सुरुवातीला किरकोळ वाद होऊन बाचाबाची झाली.

मात्र, काही वेळातच मोठा जमाव जमला व जमावातील काही युवकांनी नवलानी यांच्यावर हल्ला चढवला. त्यांना मारहाण करण्यात आली. घटनेनंतर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या डोक्याला पाच टाके पडले आहेत. या हाणामारीत सोन्याची साखळी व इतर दागिनेही गहाळ झाले आहेत.

पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जमावाला पांगवले. घटनास्थळावरून पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहेत. त्यानुसार तपास सुरू करण्यात आला आहे. तीन वर्षांपूर्वी नवलानी यांच्यावर कापड बाजारात दुकानजवळील विक्रेत्याशी झालेल्या वादातून चाकूने वार करण्यात आले होते. आता पुन्हा एकदा त्यांच्यावर जमावाकडून हल्ला झाला आहे. या हल्ल्यामागे अपघाताचे कारण दिसत असले तरी ३ वर्षांपूर्वी झालेल्या वादाची या हल्ल्याला किनार असल्याची चर्चा व्यापारी वर्गात आहे. या प्रकरणी पोलिसांनी अनोळखी युवकांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## चोरट्यांचा धुमाकूळ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहरातील बुरुडगाव रोड परिसरातील सारसनगर भागात घरफोड्यांची मालिका सुरू असून चोरट्यांनी विविध भागात डल्ला मारत नागरिकांची झोप उडवली आहे. समता नगर, अभिनव कॉलनी, , फुलसौंदर मळा, ओम कॉलनी, नानाजी नगर तसेच महादेव मंदिर परिसरात चोरीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भागांमध्ये मिळून आठ ते दहा घरफोड्या झाल्याची माहिती समोर आली असून चोरटे रात्रीच्या वेळी घरांना लक्ष्य करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, हे चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले असूनही अद्याप त्यांना अटक करण्यात आलेली नाही, यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक संजय चोपडा यांनी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्याकडे निवेदन देत चोरट्यांना तात्काळ अटक करून कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सातत्याने होत असलेल्या घरफोड्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून पोलिसांनी तातडीने तपास गतीमान करून आरोपींना अटक करावी. तसेच संबंधित परिसरात पोलीस गस्त वाढवून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या घटनांमुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले असून लवकरात लवकर कारवाई होऊन चोरट्यांना अटक व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## हॉटेलवर पोलिस पथकाचा छापा, महिलांची सुटका

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पुणे महामार्गावरील हॉटेल मध्ये सुरु असलेल्या कुंटणखान्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या (एएचटीयु) पथकाने छापा टाकत ४ पिडीत महिलांची सुटका केली आहे. या महिलांकडून वेश्या व्यवसाय करून घेणाऱ्या हॉटेल चालकासह दोघांवर सुपा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाचे पो.नि. रविंद्र देशमुख यांना ३१ मार्च रोजी नगर पुणे रोडवरील जातेगाव (ता.पारनेर) शिवारात हॉटेल जयराज येथे वेश्या व्यवसायाकरिता महिलांना रूम उपलब्ध करून देवून त्यांचेकडून वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यामुळे पो.नि. देशमुख यांनी नियंत्रण कक्षातील पो.नि. हमीद शेख यांच्या सह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या पथकाला कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पो.नि. हमीद शेख यांनी पथकासह जावून पंचांसमक्ष बनावट ग्राहक पाठवून खात्री करून हॉटेल जयराज येथे जावून छापा टाकला असता सदर ठिकाणी कलंदर सत्तारअली शेख (रा. वडू रोड, कोरेगाव भिमा, ता. शिरूर जि. पुणे), हनुमंत अशोक देटके (रा. नागटापी, सासपडी, ता.जि. सातारा) हे दोघे मिळून आले. तसेच सदर ठिकाणी असलेल्या रूमची झडती घेतली असता सदर ठिकाणी रूममध्ये ४ महिला मिळून आल्या. सदर महिलांची सुटका करण्यात आलेली असून दोघा आरोपींना ताब्यात घेवून आरोपी व पिडीत महिला यांना सुपा पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले. दोघा आरोपींवर सुपा पोलीस स्टेशन येथे स्त्रिया व मुली यांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५, ७, ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## पुनर्वसित गावांच्या विकासासाठी ५१ कोटीचा पुनर्वसन निधी मंजूर

नेवासा : (स. गांवकरी)

- आमदार विठ्ठलराव लंघे यांची माहिती



नेवासा तालुक्यातील जायकवाडी प्रकल्प बाधित नेवासा तालुक्यातील २६ पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधांसाठी ५१ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी। मिळाल्याची माहिती आमदार विठ्ठलराव लंघे यांनी दिली. नेवासा मतदारसंघातील जायकवाडी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या अनेक गावांचे पुनर्वसन करण्यात आले. विशेषतः गोदावरी,प्रवरा नदीकाठच्या या गावांमध्ये रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब होती. वेळेवर संपर्क साधता न आल्याने गावकऱ्यांना मूलभूत गरजांसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावांसाठी रस्त्यांची सोय होणे अत्यंत आवश्यक होते. अधिवेशनादरम्यान आमदार विठ्ठलराव लंघे यांनी या गावांना नागरी सुविधा मिळाव्यात यासाठी प्रश्न उपस्थित केला होता. शासनाने पुनर्वसित गावांचा आराखडा तयार केला; मात्र १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पासाठी पुनर्वसन अधिनियम अस्तित्वात नसल्याचे कारण देत हा प्रस्ताव फेटाळण्यात आला होता. त्यानंतर आमदार विठ्ठलराव लंघे यांनी तत्कालीन अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांची भेट घेऊन वस्तुस्थिती मांडली. त्यांच्या निर्देशानंतर १९७६ पूर्वीच्या गावांचाही या आराखड्यात समावेश करण्यात आला आणि निधी उपलब्ध करून देण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचा अध्यादेश काढण्यात आला.

या कामांची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाली असून येत्या काही दिवसांत कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती आमदार विठ्ठलराव लंघे यांनी दिली. यामध्ये पोहोच रस्ते, खडीकरण, डांबरीकरण तसेच ग्रामपंचायत कार्यालयांसारख्या नागरी सुविधांचा समावेश आहे. पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी मंजूर केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राजी पवार, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंदजी पाटील तसेच पालकमंत्री राधाकृष्णजी विखे पाटील यांचे आभार मानले.

दरम्यान, आमदार विठ्ठलराव लंघे यांचे वडील माजी आमदार कैलासवासी वकील अण्णा लंघे यांनी जायकवाडी धरणग्रस्तांसाठी मोठा लढा उभारला होता. महाराष्ट्रात पुनर्वसनाचा कायदा होण्यासाठी त्यांच्या लढ्याचे मोठे योगदान मानले जाते. गेल्या सुमारे ५० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या धरणग्रस्तांच्या प्रश्नांकडे पुन्हा एकदा आमदार विठ्ठलराव लंघे यांनी लक्ष घालून निधी मिळवून दिल्याने सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

धरणग्रस्तांच्या प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा करून शासनाकडून निधी मंजूर करून घेणे, पुनर्वसित गावांच्या विकासासाठी प्रयत्न करणे आणि सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्याची त्यांची भूमिका कौतुकास्पद ठरत आहे.

बहिरवाडी, फत्तेपूर, प्रवरासंगम, खलाल पिंपरी, बकू पिंपळगाव, मंगळापूर, खेडले काजळी, तरवडी, उस्थळ दुमाला, भालगाव, गोधेगाव ,धामोरी, गळनिंब, गोपाळपूर, रामडोह खामगाव, सुरेगाव (गंगा), जैनपूर, सुरेगाव दही, खामगाव नंबर ३, वरखेड, खामगाव नंबर २, उस्थळ खालसा, बेलपांढरी, खामगाव नंबर १, बोरगाव .

## डॉ. आंबेडकर आयुष रुग्णालय नामकरणाबाबत अनुकूल

### कार्यवाहीसाठी प्रस्ताव राज्य सरकारकडे वर्ग : खासदार नीलेश लंके यांचा पुढाकार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील केंद्र प्रायोजित आयुष रुग्णालयास 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुष रुग्णालय' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. खासदार लंके यांच्या प्रस्तावास मंत्री प्रतापराव जाधव यांनी अनुकूलता दर्शवित कार्यवाहीसाठी प्रस्ताव राज्य सरकारकडे वर्ग केला आहे.

खासदार लंके यांनी १५ डिसेंबर २०२५ रोजी आयुष मंत्रालयाला सविस्तर पत्र पाठवून या नामकरणामागील सामाजिक व संविधानिक भूमिका स्पष्ट केली आहे. ग्रामीण भागातील नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वंचित घटकांसाठी संबंधित आयुष रुग्णालय अत्यंत महत्त्वाचे आरोग्यसेवा केंद्र ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय, समानता व सर्वसमावेशक विकासाच्या विचारांना अभिवादन म्हणून या रुग्णालयास त्यांचे नाव देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. खासदार लंके यांच्या पत्रास आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यांनी ३० मार्च २०२६ रोजी पाठविलेल्या उत्तरात या प्रस्तावाची दखल घेतली असून, संबंधित विषय महाराष्ट्र सरकारकडे पुढील कार्यवाहीसाठी वर्ग करण्यात आल्याची माहिती दिली आहे.

मंत्री जाधव यांनी स्पष्ट केले की संबंधित रुग्णालय राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत '५० खाटांचे एकात्मिक आयुष रुग्णालय' म्हणून मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे नावात राष्ट्रीय आयुष अभियानाचा संदर्भ असणे आवश्यक आहे.

तसेच केंद्र प्रायोजित योजना असली तरी नामकरणाचा अंतिम अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे त्यांनी नमूद केले. सदर प्रस्ताव दिनांक १६ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात आला असून, आता या नामकरणाबाबतचा अंतिम निर्णय राज्य सरकारकडून अपेक्षित आहे. या नामकरणामुळे सामाजिक न्यायाच्या मूल्यांना बळकटी मिळेल, तसेच वंचित घटकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. संबंधित प्रस्तावास स्थानिक स्तरावर सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, लवकरच राज्य सरकार यावर निर्णय घेईल, अशी अपेक्षा आहे.

## क्रिकेटच्या वादातून नगर तालुक्यातील भातोडीत हाणामारी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर तालुयातील भातोडी गावात क्रिकेटच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मोठ्या हाणामारीत झाले आहे. या घटनेत लाकडी दांडके आणि लोखंडी रॉडचा वापर करण्यात आला असून, हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला आहे.याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३१ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली.जुन्या वादाची कुरापत काढून आरोपी शकील बबलू सय्यद, दगडू अब्दुलरहेमान शेख, फिरोज नजीर सय्यद आणि अरमान फिरोज सय्यद (सर्व राहणार भातोडी) हे हातामध्ये लाकडी दांडके, लोखंडी पाईप आणि रॉड घेऊन आले. त्यांनी फिर्यादीच्या नातेवाईकाने क्रिकेट स्पर्धेच्या वेळी केलेल्या वादाचा आणि मोबाईल फोनवर संपर्क साधल्याचा जाब विचारला. यावेळी आरोपींनी शिवीगाळ करत फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबाला धमकावले. वादाचे स्वरूप वाढल्याने आरोपींनी हातातील शस्त्रांनी बेदम मारहाण सुरू केली. या हल्ल्यात फिर्यादीच्या हाताच्या बोटावर लोखंडी रॉडचा जोरात फटका बसल्याने त्यांचे बोट मोडले असून गंभीर स्वरूपाची दुखापत झाली आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पीडित व्यक्तीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार लोखंडे करत आहेत. नगर तालुक्यातील कौडगाव येथे जुन्या वादातून दोन तरुणांनी एका शेतकऱ्यासह त्यांच्या आईला लोखंडी गजाने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात विजय बबन नवथर आणि समाधान (पूर्ण नाव माहित नाही) या दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सूर्य नगर तपोवन रोडवरील हनुमान मंदिर परिसर सुशोभीकरण शुभारंभ

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



"हनुमान मंदिर हे परिसरातील श्रद्धास्थान असून या ठिकाणाचे सुशोभीकरण केल्याने नागरिकांना अधिक स्वच्छ व आकर्षक वातावरण मिळेल. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कामांना आम्ही प्राधान्य देत आहोत.

माजी खासदार डॉ.सुजय विखे यांच्या निधीतून व आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने मंदिर सुशोभीकरण करण्यात येत आहे. नागरिकांनीही परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे." असे प्रतिपादन महापौर ज्योती गाडे यांनी केले. सूर्य नगर तपोवन रोडवरील पावन हनुमान मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचे महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते नारळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती व नगरसेविका सौ. वर्षा रोहन सानप, नगरसेविका सौ.रोशनी त्र्यंबके,बाळासाहेब पवार, निखिल वारे,महेश तवले,विशाल नाकाडे,रोहन ढवण,रोहन सानप,कैलास गजे, बाबा घुले,शेखर धाडगे, ऋत्विक कथने,राजू भाऊ बोरूडे, बापू जाधव,तळेकर, किशोर पांगुळ,राजू नरोटे, तुषार गवळी,आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

सभापती तथा नगरसेविका वर्षा रोहन सानप म्हणाल्या "सूर्य नगर परिसराच्या विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. हनुमान मंदिर परिसराचे सुशोभीकरण हे नागरिकांच्या मागणीप्रमाणे करण्यात येत असून यामुळे परिसर अधिक सुबक आणि सुंदर होणार आहे. पुढील काळातही नागरिकांच्या गरजेनुसार विविध विकासकामे राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील."

## थोडक्यात पण महत्वाचे



### ग्राम रोजगार सेवकांचे काम बंद आंदोलन

रावेर (स. गांवकरी) : तालुक्यातील ग्राम रोजगार सेवकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी फिक्स मानधन मिळण्यासाठी संघटनेच्या राज्य कोर कमिटी मध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने रावेर तालुक्यातील सर्व ग्राम रोजगार सेवकांनी दिनांक एक एप्रिल पासून काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला यावेळी तालुक्यातील संघटनेने तहसीलदार रावेर तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती रावेर यांना काम बंदचे निवेदन दिले. यावेळी संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य सईद शेख निंबोल तसेच मा. जिल्हाध्यक्ष संतोष पाटील मोरगाव. आरती ठाकरे चिनावल सिताराम वानखेडे विटवे सुनील चव्हाण मुबारक तडवी समशेर तडवी महेश बारेला संजय महाजन मुनाफ तडवी इत्यादी राम रोजगार सेवकांच्या सह्या सदर निवेदनावर केलेल्या आहेत. दिनांक 3 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी होऊन प्रत्येक ग्राम रोजगार सेवकांच्या वैयक्तिक बँक अकाउंट वर डीबीटी द्वारे मानधन मिळावे तसेच ग्राम .रोजगार सेवकांना आकृतीबंध समायोजन करून नियमित सेवेत घ्यावे तसेच इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना शासनाच्या सर्व सुविधा लागू कराव्यात यांच्यासह इतर मागण्यांसाठी आम्ही काम बंद आंदोलन करीत आहोत. असे सर्व ग्राम रोजगार सेवकांनी एका सुरात म्हटले आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या मंजूर होत नाहीत तोपर्यंत आम्ही काम बंद आंदोलन राज्य संघटनेच्या कृती समितीच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर चालूच ठेवू असे यावेळी जमलेल्या ग्रामरोजगार सेवकांनी सांगितले.

### बावडा वडापुरी परिसरात जोरदार वाऱ्यासह अवकाळी पावसाची हजेरी


इंदापूर (स. गांवकरी) : दि. 2 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी बावडा, निरनिमगाव, भगतवाडी, सराटी, सुरवड, वकीलवस्ती वडापुरी परिसरात विजांच्या कडकडाटासह जोरदार वाऱ्याने अवकाळी पाऊस झाला असून यामध्ये चारा पिके,आंबा, केळी, गहू,हरभरा, कांदा या पिकांचे नुकसान झाल्याची शक्यता शेतकऱ्यांकडून वर्तवली जात आहे.तसेच गुरुवारी वडापुरी येथील आठवड्या बाजाराची अक्षरशः पाऊस आणि वाऱ्याने बाजार करणाऱ्यांची, व्यापारी व शेतकऱ्यांचे यामध्ये प्रचंड नुकसान झाल्याचे दिसून आले. वाऱ्याची तीव्रता जास्त असल्याने पिकांना याचा जोराचा फटका बसला आहे.

### आज विराट हिंदू संमेलन व भव्य कलश शोभायात्रेचे आयोजन

- रामायणाचार्य ह.भ.प.नवनाथ महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत विराट हिंदू संमेलन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : तोफखाना व नालेगाव व कल्याण रोड परिसरातील नागरिकांच्या वतीने आज (शनिवारी दि. ४ एप्रिल) रोजी सायं ५ वाजता रोजी विराट हिंदू संमेलन व भव्य कलश शोभायात्रेचे आयोजन दिल्लीगेट वेस, शनी मंदिर,अहिल्यानगर या ठिकाणी करण्यात आले आहे. या विराट हिंदू संमेलनामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी रामायणाचार्य, भागवताचार्य, शिवचरित्र व्याख्याते तथा सद्गुरु नारायणगिरीजी गुरुकुलचे संस्थापक ह.भ.प.नवनाथ महाराज म्हस्के,आशुतोष महादेव देवस्थान चे ह.भ.प.राहुल महाराज दरंदले प्रमुख उपस्थित राहणार आहेत.तर यावेळी प्रमुख वक्ते रा.स्व. संघ धर्म जागरण प्रांत मंडळ सदस्य (प्रांत परियोजना प्रमुख)सुनिल काळे हे मार्गदर्शन करणार आहेत. शोभा यात्रा सायंकाळी पाच वाजता श्री राम मंदिर, नेता सुभाष चौक ते दिल्लीगेट वेस पर्यंत आयोजित करण्यात आली आहे. महिलांनी डोक्यावर कलश घेवून शोभायात्रेत सामील व्हावे.तसेच परिसरातील सर्व नागरिकांनी या हिंदू संमेलनात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अहिल्यानगर शहरात भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.तरी हिंदू समाजातील प्रत्येक बांधव व भगिनींनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.संमेलनानंतर महाप्रसादाची व्यवस्था केली आहे.

### बाल हनुमान हर्षद आनेचा यांनी नगरकरांना केले मंत्रमुग्ध



अहिल्यानगर (स. गांवकरी) : चि. हर्षद योगेश आनेचा हे बाल हनुमान म्हणून नगर शहराला परीचीत आहे.वयाच्या सहाव्या वर्षापासून बाल कलाकार हर्षद आनेचा हे हनुमानाची आकर्षक अशी वेशभूषा करून श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर नवीपेठ येथील हनुमान चालीसा मंडळामध्ये बाल हनुमान म्हणून सेवा देत आहेत.रामजी की निकली सवारी, सुनते ही राम नाम नाचे हनुमान, दुनिया चले न श्रीराम के बिना,अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान अशा अनेक भजनांवर नृत्याची सेवा देतात. हनुमान चालिसा वर नृत्य हे सर्वांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले या संगीतमय भजनांवर नृत्य करून बाल हनुमान हर्षद आनेचा यांनी सर्व नगरकरांना मंत्रमुग्ध केले आहे. दरवर्षी अहिल्यानगर येथे ३१ दिवस होणाऱ्या सामुहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमात बाल हनुमान हर्षद योगेश आनेचा उपस्थित असतात. हर्षद आनेचा यांना मंडळाचे अध्यक्ष प्रितम मुथा, उपाध्यक्ष निखिल शेटीया, मंडळाचे जेष्ठ सदस्य अशोक खंडेलवाल , वडील योगेश आनेचा व आई सौ. नंदा आनेचा यांच्याकडून प्रेरणा मिळाली आहे.त्यामुळे बाल हनुमान हर्षद आनेचा यांच्यावर बाल वयापासूनच धार्मिक संस्कार झालेले आहेत. अहिल्यानगर शहरामध्ये बाल हनुमान हर्षद योगेश आनेचा आणि श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट यांचा डंका वाजत आहे.

### ‘ऑरेंज अलर्ट’व ‘यलो अलर्ट’ नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यात मार्च महिन्यांच्या मध्यापासून बेमोसमी वादळी पावसाला सुरूवात झालेली असून येत्या रविवार (दि.५) पर्यंत वादळी पावसासह गारपिठीची शक्यता कायम आहे. जिल्ह्यात आज पुन्हा ऑरेंज, उद्या शनिवारी येलो तर रविवारी पुन्हा वादळी पावसाची शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, गुरूवारी दुपारपासून नगरसह जिल्ह्याच्या विविध भागात ढगाळ वातावरणासह अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत होत्या. ऐन उन्हाळ्यात पावसाळी वातावरण तयार झाले होते. गेल्या १५ दिवसापासून जिल्ह्यात बेमोसमी पाऊस कोसळत आहे. या पावसामुळे हजारो शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झालेले असून कृषी आणि महसूल विभागाकडून झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरू आहे.

# ‘सांस्कृतिक उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना’

## प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर : डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात “रिदम-2026” सांस्कृतिक महोत्सव उत्साहात

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित करण्यात आलेला “रिदम-2026” हा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात आणि जल्लोषात पार पडला.

महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. नवथर पुढे म्हणाले की, अशा प्रकारच्या सांस्कृतिक महोत्सवांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. आत्मविश्वास, संघभावना, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त ठरते. शिक्षणासोबत कला आणि संस्कृतीचा समतोल साधल्यास विद्यार्थी सर्वांगीण प्रगती करू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.



महोत्सवाची सुरुवात “ग्रुप डे / मिसमॅच डे” या आकर्षक उपक्रमाने झाली. विद्यार्थ्यांनी एकसारख्या रंगातील तसेच वेगवेगळ्या मिसमॅच वेशभूषेत सहभाग घेत रंगत आणली. त्यानंतर साजऱ्या झालेल्या “बॉलिवूड डे” मध्ये विद्यार्थ्यांनी विविध बॉलिवूड पात्रांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

तसेच “हॅलोविन डे / ब्लॅक अँड व्हाइट डे / साडी व टाय डे” या विविध थीम्समुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. विद्यार्थ्यांनी कल्पक आणि सर्जनशील वेशभूषा सादर करत महोत्सवात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. महोत्सवाचा समारोप “ट्रॅडिशनल डे” ने झाला. पारंपरिक पोशाखात सजलेल्या विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले.

सर्व कार्यक्रम महाविद्यालय परिसरातील नासा पॉईंट येथे पार पडले. स्नेहसंमेलन समन्वयक म्हणून प्रा. सुनील मांढरे यांनी काम पाहिले. शिक्षक समन्वयक म्हणून डॉ. सौ. के. डी. विधाते, प्रा. सौ. प्राची मोरे व प्रा. सौ. पूजा काजळे यांनी मोलाचे योगदान दिले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सिद्धार्थ हाके, स्नेहा आहिरे, राज देशमुख, रोहित फेगडे, पूजा बनसोडे, ओंकार जोशी, स्वेता सोनावणे व ओम रक्षे यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

याशिवाय, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनील कल्हापुरे तसेच प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील तसेच चेअरमन व राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला तसेच महाविद्यालयीन जीवनातील आनंददायी क्षण अनुभवायला मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व संबंधितांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंतीचे आयोजन

भिवंडी : (स. गांवकरी)




- २५ गावांचा सहभाग; प्रबोधन सत्र, भव्य मिरवणूक

पडघा परिसरात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागाच्या वतीने मंगळवार, दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पडघा येथील जिल्हा परिषद मराठी केंद्र शाळेत करण्यात आले असून सकाळी १०.३० वाजता उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. उद्घाटनानंतर बुद्ध वंदना तसेच मान्यवरांचे स्वागत व सत्कार समारंभ होईल .तर यंदाच्या जयंती महोत्सवात प्रबोधनाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. प्रबोधन सत्रात प्रसिद्ध शाहीर आकाश पवार हे “आम्ही भारताचे लोक आणि भारतीय संविधान” या विषयावर मार्गदर्शन करणार असून उपस्थितांना संविधानाविषयी जागरूक करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सायंकाळी ६ वाजता समतानगर बुद्ध विहार येथून जिल्हा परिषद मराठी शाळा, पडघा पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.या मिरवणुकीत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा विद्युत दिव्याची रोषणाई आणि फुलांनी सजविलेल्या रथावर विराजमान करून जयघोषाच्या वातावरणात जयंती साजरी होणार आहे. या संयुक्त जयंती उत्सवासाठी पडघा परिसरातील तब्बल २५ गावे एकत्र येत असून सामाजिक ऐक्य व महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करण्याचा उद्देश आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## दक्षिणमुखी मारुती मंदिरात पुष्पवृष्टी करून जन्मोत्सव साजरा

नेवासा : (स. गांवकरी)

हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने श्री समर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या नेवासा बुद्रुक येथील दक्षिणमुखी मारुती मंदिरात पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास पुष्पवृष्टी करून हनुमंतरायाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला."राम लक्ष्मण जानकी ",जय बोला हनुमान की"पवनसूत हनुमान की जय" असा जयघोष यावेळी करण्यात आला.



हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत गाडगेबाबा भजनी मंडळाच्या वतीने हनुमंतरायाची भजने गाण्यात आली.यावेळी विमा कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे व देवस्थानचे प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात जागृत दक्षिणमुखी मारुतीरायाला अभिषेक घालण्यात आला. त्रिदिनात्मक सोहळयाचे व्यासपीठ चालक हभप कोंडीराम महाराज पेचे,ज्ञानेश्वर महाराज पेचे,गाडगेबाबा भजनी मंडळाचे मार्गदर्शक गोकुळनाना जायगुडे,ह.भ.प. सौ. रंजनाताई भाकरे, ह.भ.प. सखाराम शिंदे टेलर,केशव महाराज डौले यांच्यासह सहकाऱ्यांनी भजने गायली.

पहाटे ६ वाजून १५ मिनिटांनी हनुमंतरायांचा जयघोष करत पुष्पवृष्टीद्वारे जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला यावेळी झालेल्या हनुमंतरायाच्या जन्मोत्सव प्रसंगी दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थानचे अध्यक्ष गंगाभाऊ शिंदे व सचिव अँड.वसंतराव नवले यांनी आलेल्या भाविकांचे स्वागत केले.यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य ग्रामपुरोहित श्री लाला गुरू जोशी यांनी केले.

जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष गंगाभाऊ शिंदे,सचिव अँड.वसंतराव नवले,खजिनदार माजी सरपंच दादासाहेब कोकणे,विश्वस्त धनंजय डहाळे, शेषराव डौले,राजेंद्र मारकळी,संभाजी बेद्रे,भानुदास रेडे,सौ. लताताई बोरकर,सुनील डोहोळे,भाऊसाहेब जायगुडे,किसन कोकणे,गणेश क्षीरसागर,शंकर वांढेकर,पुजारी भाऊ दाणे सेवेकरी सुनील डहाके यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पहाटे झालेल्या जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. जन्मोत्सवाच्या निमित्ताने दक्षिणमुखी मारुती मंदिरावर केलेली भव्य विद्युत रोषणाई भाविकांचे आकर्षण ठरली होती.श्री हनुमंतरायाच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने त्रिदिनात्मक सोहळयाचे व्यासपीठ प्रमुख हभप कोंडीराम महाराज पेचे यांचे हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने प्रवचन झाले.

हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने गुरुवारी पहाटे पासूनच नेवासा बुद्रुक येथील दक्षिणमुखी मारुती मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी सुरू होती पहाटेच्या सुमारास जन्मोत्सव साजरा झाल्यानंतर उपस्थित भाविकांना शिऱ्याच्या प्रसादाचे वाटप तर प्रवचनानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## वघई तालुक्यात भाजपसमोर ‘उमेदवार संकट’; निवडणुकीपूर्वीच अडचणी वाढल्या – भाजपसाठी “अमंगल” ग्रहण

### डांगच्या वघई तालुक्यात भाजपला उमेदवारांची टंचाई, अंतर्गत मतभेदांमुळे निवडणुकीआधीच परिस्थिती गंभीर

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजताच राजकीय वातावरण तापलेले दिसत आहे. सर्व पक्ष उमेदवार निवडीसाठी जोरदार प्रयत्न करत असताना, स्वतःला जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणवणाऱ्या भाजपसमोर डांग जिल्ह्यातील वघई तालुक्यात चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डांग जिल्हा पंचायतमधील बर्डा, साकरपातळ आणि कोसीमदा या महत्त्वाच्या जागांवर भाजपला सक्षम उमेदवार मिळत नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या जागा अनेक वर्षांपासून काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेल्या असून, सध्याची परिस्थिती भाजपसाठी अधिकच आव्हानात्मक ठरत आहे.

गेल्या दोन दिवसांपासून भाजप संघटनेतर्फे इच्छुकांकडून अर्ज भरून घेऊन त्यांचा ‘सेन्स’ घेतला जात असला, तरी प्रत्यक्ष मैदानात उतरण्यासाठी सक्षम चेहऱ्यांची कमतरता स्पष्ट दिसत आहे. “सबका साथ, सबका विकास” या घोषणेसह सत्तेत असलेल्या भाजपसाठी ही स्थिती राजकीयदृष्ट्या गंभीर संकेत देणारी आहे.

या संकटामागे अलीकडेच स्थापन झालेल्या जिल्हा संघटनेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दीर्घकाळ पक्षासाठी काम करणाऱ्या आदिवासी कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करून बिगर-आदिवासी नेत्यांना महत्त्वाच्या पदांवर संधी दिल्याचे आरोप होत आहेत. त्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढून संघटना कमकुवत झाल्याचे चित्र आहे.याशिवाय, जिल्हा अध्यक्ष आणि आमदार गटांतील गटबाजीही पक्षासाठी डोकेदुखी ठरत आहे. संघटन प्रभारींकडून प्रयत्न सुरू असतानाही अंतर्गत मतभेद मिटत नसल्याचे दिसते.

राजकीय समीकरणांमध्ये आणखी खळबळ तेव्हा उडाली, जेव्हा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार मंगळ गावित यांनी भाजप सोडून पुन्हा काँग्रेसमध्ये ‘घरवापसी’ केली. त्यांच्या लोकप्रियतेमुळे भाजपसमोरचे आव्हान अधिकच वाढले आहे. त्यांच्या या निर्णयानंतर डांग भाजपसाठी जणू “अमंगल” ग्रहण लागल्याची चर्चा आहे.

त्यांच्यासोबत आहवा आणि सुबीर तालुक्यातील काही प्रभावशाली नेत्यांनीही भाजपचा निरोप घेत काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे, ज्यामुळे निवडणुकीपूर्वीच राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत ,भाजप समर्थक एका कुटुंबातील दोन सदस्यांनी वेगवेगळ्या पदांवर असतानाही उमेदवारी अर्ज दाखल केल्याने अंतर्गत वाद अधिकच तीव्र झाला आहे. आगामी काळात पक्षाने स्पष्ट निकषांशिवाय उमेदवारी नाकारल्यास बंडखोरी आणि पक्षविरोधी हालचाली होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संपूर्ण परिस्थिती पाहता, वघई, सुबीर आणि पूर्वपट्टी भागातील आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुका भाजपसाठी अत्यंत कठीण ठरण्याची शक्यता आहे, तर काँग्रेस आणि इतर पक्षांसाठी ही मोठी संधी ठरू शकते.

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून पाहणी

शिर्डी : (स. गांवकरी)

- राहाता तालुक्यात अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान
- १०० टक्के पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश

अवकाळी पाऊस, गारपीट व वादळामुळे राहाता तालुक्यासह जिल्ह्यात झालेल्या शेती पिकांच्या आणि अन्य नुकसानीचे महसूल व कृषी भागाने एकत्रितपणे १०० टक्के अचूक पंचनामे करून अहवाल सादर करावेत, असे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिले. गुरुवारी जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडून नुकसानीची माहिती घेतली. तसेच, बाधित शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळवून देण्याच्या उद्देशाने त्यांनी मौजे पाथरे (बु.) येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. राहाता तालुक्यातील पाथरे (बु.) येथील शेतकरी संजय भाऊसाहेब घोलप व गोपालक सोपान घोलप यांच्या शेताला व गोठ्याला पालकमंत्र्यांनी भेट दिली. वादळी वाऱ्यामुळे विजेची तार अंगावर पडून आणि विद्युत धक्का बसल्याने ९ गायी दगावल्याच्या दुर्दैवी घटनेची त्यांनी पाहणी केली. मंत्री विखे पाटील यांनी घोलप कुटुंबीयांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना धीर दिला. यावेळी 'घोलप कुटुंबीयांना सर्वतोपरी सहकार्य करून शासन स्तरावरून तातडीने मदत कशी मिळेल, यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत,' अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, वादळाने पडलेल्या वीजवाहक तारा व विजेच्या खांबांच्या समस्या तातडीने सोडवून गावातील वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे निर्देशही वीज वितरण कंपनीला दिले.

# अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील आदर्शगाव सुरेशनगर येथील हनुमान मंदिरामध्ये हनुमान जयंती निमित्त आयोजित अखंड हरीनाम सप्ताह त्रिदिनात्मक सोहळयाची युवा कीर्तनकार हभप रामजी महाराज खरवंडीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने काल्याची दहीहंडी फोडून गुरुवारी रात्री भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.



यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी आलेल्या सर्व संत मंडळीसह मान्यवरांचे सरपंच कल्याणराव उभेदळ यांनी स्वागत केले.माजी उपसरपंच विठ्ठलराव पाषाण यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित संत महंतांचे संतपूजन व उपस्थित मान्यवर मंडळीसह अन्नदान करणाऱ्या दात्यांचा सोहळा कमिटीच्या वतीने सन्मान करण्यात आला. झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी हभप राम महाराज खरवंडीकर यांनी हनुमंतरायांचे चरित्र महिमा व त्यांचे अवतार कार्य आपल्या कीर्तनातून बोलतांना विषद केले.भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन त्यांनी अनेक प्रसंग सांगून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी त्रिदिनात्मक सोहळयाचे व्यासपीठ प्रमुख हभप नितीन महाराज हारकळ,हभप विष्णुदास महाराज सांगळे महाराज,सोहळा कमिटीचे मार्गदर्शक सरपंच कल्याणराव उभेदळ.विठ्ठलराव पाषाण,भागचंद पाडळे. जिजा उभेदळ,सतीश क्षीरसागर,शरदभाऊ शेटे,प्रकाश नवले,हर्षद पाटील,प्रमोद उभेदळ,अशोक खंडागळे, बबनराव शेटे,भीमा चव्हाण,अशोक साळुंके,भाऊसाहेब भोसले,मेजर ज्ञानेश्वर शिंदे,मनोहर जाधव,खंडुभाऊ निकाळजे,अक्षय विधाटे सुरेशनगर गावातील सर्व तरुण मंडळाच्या सदस्यांसह पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

त्रिदिनात्मक सोहळयामध्ये पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील अठराव्या अध्यायाचे पारायण,सायंकाळी ५ ते ६ सामूहिक हरिपाठ, रात्री ७ ते ९ किर्तनाचे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडल्याबद्दल सोहळा कमिटीच्या वतीने योगदान देणाऱ्या दात्यांसह उपस्थित भाविक सेवेकरी, तरुण मंडळाचे कार्यकर्ते यांचे आभार मानण्यात आले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (मुले) स्पर्धेचे थाटात उदघाटन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (मुले) स्पर्धेचे उद्घाटन दि .२ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी क्रीडा मैदानावर पार पडले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हे उद्घाटन क्रीडा मशाली द्वारे ज्योत पेटवून आणि रंगबिरंगी फुगे हवेत सोडून पार पडले. यावेळी त्यांच्या समवेत भारतीय खो-खो संघाची कर्णधार प्रतीक वाईकर, आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू हर्षल हातानकर, ऑल इंडिया युनिव्हर्सिटीचे निरीक्षक डॉ.जगदीश गस्ती, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.प्रशांत पेशकार, डॉ.सूर्यकांत जोगदंड, डॉ.सुरेखा भोसले, कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार, क्रीडा संचालक डॉ.भास्कर माने, अधिसभा सदस्य डॉ.महेश बेंबडे, रासेयो संचालक डॉ मारुती गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती. दिनांक २ ते ६ एप्रिल २०२६ या दरम्यान चालणाऱ्या या खो-खो स्पर्धेसाठी पाच राज्यातून जवळपास ७४ टीमने सहभाग नोंदवला आहे.

## नैसर्गिक शेतीचा 'हुंकार'; प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना मिळालं बळ!



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : एप्रिल नैसर्गिक शेतीच्या प्रसारासाठी आणि विषमुक्त अन्ननिर्मितीला चालना देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी नांदेड, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग व आत्मा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'नैसर्गिक शेती अभियान' अंतर्गत जैविक निविष्ठा निर्मिती व शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम नांदेड तालुक्यातील ढोकी, सुगांव व पिंपळगाव कोरका या गावांमध्ये आयोजित करण्यात आला होता. रासायनिक शेतीला सक्षम पर्याय उपलब्ध करून देत शेतीचा खर्च कमी करणे आणि जमिनीचे आरोग्य सुधारणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. यावेळी कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व पटवून देताना, "शाश्वत शेतीसाठी आणि जमिनीच्या सुपीकतेच्या जतनासाठी नैसर्गिक शेती हाच सर्वोत्तम मार्ग आहे," असे प्रतिपादन केले.

## भव्य शोभायात्रेचे हडको सिडको अनेक ठिकाणी उत्साहात स्वागत



नवीन नांदेड (स. गांवकरी) : श्री.हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने सिडको परिसरात काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेचे हडको सिडको भागात विविध ठिकाणी पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले तर हैद्राबाद येथुन आणलेल्या दहा फुटी आकर्षक हनुमान मुर्ती व राम दरबार,भोलेनाथ यासह हनुमान देखावा आकर्षण ठरला य भव्य शोभायात्रेचे ऊध्दघाटन नांदेड दक्षिण चे बोंढारकर व सिडको प्रभागातील भाजपाचे नगरसेवक व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

## हिमायतनगरमध्ये अवैधरित्या व्यवसा विरुद्ध प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष?

हिमायतनगर (स. गांवकरी) : शहरात सध्या अवैध धंदे चालकांचा सुळसुळाट झाला असून नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे शहरातील काही भागात. खुले आम अवैध धंद्यांना जोमात चालत असून स्थानिक प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये जुगार अड्डे व देशी दारू विक्री मोठ्या प्रमाणात विक्री करत आहेत व बेकायदेशीर एजंट नेमून दारू विक्रीचा व्यवसाय जोरदार चालत आहे. सध्या चालत असलेली बेकायदेशीर रित्या चालणारे अवैध धंदे हे स्थानिक नागरिकाच्या मते हे समाजाला तील पिढी ही या अवैध व्यवसाया मुळे व्यस्नाधिन होत चालली असून हो समाजा साठी घातक आहे असे मत सर्व सामान्य नागरिकांतून बोलले जात आहे. हा प्रकार गेल्या अनेक दिवसापासून राजरोस पणे चालू असून संबंधित पोलीस प्रशासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे व काही ठिकाणी रात्री उशिरापर्यंत काही संशयित हालचाली चालू सुद्धा असतात ज्यामुळे परिसरातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे यामध्ये महिलांची असुरक्षिततेची प्रश्न निर्माण होणार असल्याच्या भावना महिला तुन वाढत चालल्या आहे दरम्यान या ठिकाणी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकारा विषयी आवाज सुद्धा उठवला आहे मात्र संबंधित प्रशासनाने तात्काळ कारवाई केलेली नाही अवैध धंद्यामुळे तरुण पिढी एकदम बर्बाद होत आहे आणि दारूच्या व्यसनाधीन होत चालली आहे या तरुणाईमुळे अनेकांचे घर उध्वस्त होत आहेत संसारामध्ये दारू च्या व्यसनामुळे संसाराचा गाढा ओढतानी अनेक महिला त्रस्त असून त्यांना काय कराव समजत नाही परिणामी सर्वसाधारण लोकांवर कर्जाचा बोजा चढत आहे या सर्व गोष्टीवर सुजान नागरिक बोलले जात आहे की या होणाऱ्या सर्व बाबी कडे पोलीस प्रशासनाने जास्तीत जास्त लक्ष द्यावे तर या पिढीला काहीतरी चांगला मार्ग मिळेल असे नागरिकांतून बोलले जात आहे. जोपर्यंत पोलीस कठोर पावले उचलणार नाही तोपर्यंत अवैध धंद्याला आळा बसणार नाही असे समाजात बोलले जात आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी आंदोलनाची चेतावणी



हिमायतनगर (स. गांवकरी) : शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदन देण्यात आले असून, प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. संघटनेच्या वतीने नगरपंचायत प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी नगरपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला होता. त्यावेळी अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्याने उपोषण स्थगित करण्यात आले होते. मात्र, एक महिना उलटूनही प्रशासनाने पुतळ्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# मराठी ZEE5 सादर करत आहे मराठी फिल्म – रुबाब

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

यंदा वर्षाच्या सुरुवातीला चित्रपटगृहातील प्रदर्शनादरम्यान प्रेक्षकांसमोर झळकल्यानंतर, रुबाब मराठी ZEE5 वरील डिजिटल प्रीमिअरद्वारे व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. रॉमान्स, ड्रामा आणि इमोशन्स यांचे मिश्रण असलेला हा चित्रपट अभिमान, नातेसंबंध आणि आपण कोण आहोत हे ठरवणाऱ्या निवडीमध्ये रुजलेली कथा घेऊन येतो. आपल्या हृदयात, रुबाब ही कलाकृती सूरज आणि वैशालीच्या प्रवासाचे अनुसरण करतो. दोन प्रबळ इच्छाशक्ती असलेल्या व्यक्तींचे जीवन प्रेमाद्वारे एकत्र येते. परंतु परिस्थिती आणि स्वतःच्या भावनेची चाचणी घेतली जाते. त्यांचे नाते जसजसे विकसित होत जाते, तसतसा अभिमान, अहंकार आणि भावना मानवी संबंधांना कसे बळकट आणि आव्हान देऊ शकतात याचा शोध हा चित्रपट घेतो.




प्रणय, अॅक्शन आणि भावनिक क्षणांची सरमिसळ असलेल्या रुबाबमध्ये आत्मसन्मान आणि ओळखीचे महत्त्व प्रतिबिंबित करताना नातेसंबंधांचे चढ-उतार टिपले जातात. संभाजी ससाणे, शीतल पाटील, विशाल शिरतोडे, अभिजीत साकते आणि सिमरन खेडकर यांच्या अभिनयासह या चित्रपटाला त्याच्या आकर्षक कथा आणि अभिनयासाठी चित्रपटगृहांमध्ये प्रशंसा मिळाली. त्याच्या डिजिटल प्रीमिअरद्वारे, रुबाब आता जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. मराठी कथानकास एका व्यापक व्यासपीठावर आणत आहे.

ZEE5 वरील डिजिटल प्रीमिअरबद्दल बोलताना, झी मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी ZEE5 च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, "रुबाब ही नात्यांची खरोखरच एक हृदयस्पर्शी कथा आहे – ही कथा आहे आपल्यासोबत नेहमी असणाऱ्या आत्मसन्मानाची, आपण जपलेल्या प्रेमाची आणि स्व'ला आकार देणाऱ्या भावनांची. सांस्कृतिक पार्श्वभूमीवर आधारित चित्रपटाची कथा आपलीशी आणि घराच्या जवळची वाटते. मराठी चित्रपटाला परिभाषित करणारा प्रामाणिकपणा आणि अस्सलता यात प्रतिबिंबित होते. तसेच मराठी ZEE5 च्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर ही शक्तिशाली कथा उलगडल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो."

दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे म्हणाले, "रुबाब ही प्रेम, आत्मसन्मान, भावना आणि अहंकाराची टक्कर झाल्यावर लोक करतात त्या निवडीविषयीची कथा आहे. ही एक कथा अतिशय वास्तविक वातावरणातून उत्पन्न झालेली असून प्रेक्षकांना चित्रपटगृहांमध्ये आपलीशी वाटली, हे विशेष आहे. हा चित्रपट आता मराठी ZEE5 वर अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल याचा मला आनंद वाटतो."

संभाजी सासणे पुढे म्हणाले, "सूरजची भूमिका साकारणे हा एक अतिशय मनोरंजक अनुभव होता. कारण त्यात आत्मविश्वास आणि असुरक्षितता दोन्ही आहेत. ही कथा अनेक लोकांच्या भावना प्रतिबिंबित करते आणि मला आनंद आहे की जागतिक स्तरावरील प्रेक्षकांना आता मराठी ZEE5 वर रुबाब पाहण्याची संधी मिळेल. आम्ही त्याची आतुरतेने वाट पाहत आहोत."

# देशभरात घरगुती एलपीजी विक्री सुरळीत सुरू

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

जागतिक ऊर्जा बाजारावर चालू भौगोलिक-राजकीय परिस्थितीचा परिणाम होत असला, तरी भारतातील एलपीजी पुरवठा स्थिर, पुरेसा आणि सतत निरीक्षणाखाली आहे. घरगुती एलपीजीला सर्वाधिक प्राधान्य दिले जात आहे. इंडियन ऑइलकडून घरगुती एलपीजीचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. सध्या दररोज सुमारे 28 लाख गॅस सिलिंडर वितरित केले जात आहेत, जे भौगोलिक-राजकीय तणावापूर्वीच्या नेहमीच्या पातळीप्रमाणे आहेत. ग्राहकांनी गॅस रिफिल बुक करण्यासाठी एसएमएस आणि आयव्हीआर एससारख्या डिजिटल पद्धतींचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या सुमारे 87% बुकिंग डिजिटल माध्यमातून होत आहेत. तसेच सिलिंडर योग्य ग्राहकांपर्यंत पोहोचावा यासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (DAC OTP) द्वारे गॅस वितरण केले जात आहे. कॉर्पोरेशन आपल्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर आलेल्या ग्राहकांच्या तक्रारींवर लक्ष देत आहे आणि त्यांना त्वरीत उत्तर देण्यास कटिबद्ध आहे. इंडेनच्या ग्राहकांनी तत्काळ मदतीसाठी indanecareho@indianoil.in या ईमेलवर संपर्क साधावा, असे सांगितले आहे. काही एलपीजी वितरकांच्या गैरप्रकारांबाबत सोशल मीडिया आणि ग्राहकांच्या तक्रारींमधून माहिती मिळाली आहे.

# आदर्श पत्रकार म्हणून अमोल भोसले यांचा गौरव

लोणी काळभोर : (स. गांवकरी)

समाजात प्रामाणिकपणे कार्य करणारी अनेक मंडळी आजही मुख्य प्रवाहातील माध्यमांपासून दुर्लक्षित राहतात. अशा घटकांना प्रकाशझोतात आणण्यासाठी 'संघ नायक'सारख्या संस्था सामाजिक बांधिलकी जपत कार्यरत असल्याचे समाधानकारक असल्याचे मत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा माजी आमदार रमेश थोरात यांनी व्यक्त केले.

मूक नायक मैत्री संघ आणि दि पिपल्स वेलफेअर अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संघ नायक गौरव पुरस्कार सोहळा – २०२६' नुकताच उत्साहात पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केलेल्या 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाच्या ९९ व्या वर्षपूर्ती शताब्दी निमित्त तसेच 'संघ नायक न्यूज'च्या १० व्या वर्धापन



दिनानिमित्त हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पूर्व हवेली तालुक्यातील कोरेगावमुळ येथील सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले आणि पत्रकारितेत उल्लेखनीय कामगिरी करणारे अमोल बाबासाहेब भोसले यांना 'आदर्श पत्रकार संघ नायक पुरस्कार – २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार माजी आमदार रमेश थोरात यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# १,८०,५०४ ट्रॅक्टर्सच्या विक्रमी विक्रीची नोंद

- शेतकऱ्यांचा कंपनीवरील वाढता विश्वास, तसेच विविध प्रदेशांमधील शेतीविषयक विविध गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनीची सज्जता आणि बळकट समन्वय हेसुद्धा या अचंबित करणाऱ्या कामगिरीतून अधोरेखित झाले आहेत

पुणे : (स. गांवकरी)

भारताचा क्रमांक १ चा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या 'सोनालिका ट्रॅक्टर्स'ने तिच्या ३० व्या गौरवशाली वर्षात एका ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १,८०,५०४ ट्रॅक्टर्स एवढ्या आजवरच्या सर्वोच्च विक्रीची नोंद केली आहे. कंपनीचे शिस्तबद्ध कार्यान्वयन, 'शेतकरी-प्रथम' दृष्टिकोन आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत व 'हेवी-ड्यूटी' ट्रॅक्टर्स पुरवण्यावर असलेला सततचा भर यांचे प्रतिबिंब




दर्शविणारी अशी ही कामगिरी आहे. शेतकऱ्यांचा कंपनीवरील वाढता विश्वास, तसेच विविध प्रदेशांमधील शेतीविषयक विविध गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनीची सज्जता आणि बळकट समन्वय हेसुद्धा या अचंबित करणाऱ्या कामगिरीतून अधोरेखित झाले आहेत.

एकीकडे जागतिक वातावरण आव्हानांनी भरलेले असतानाच्या काळातही सोनालिकाने आपल्या 'जगातील क्रमांक १ च्या ट्रॅक्टर निर्मिती प्रकल्पा'मध्ये केंद्रित कार्यान्वयन,उत्पादनातील नावीन्य आणि उत्कृष्ट उत्पादन प्रक्रियेच्या माध्यमातून जबरदस्त गती कायम राखली आहे. आर्थिक वर्ष २०२६ मधील कंपनी उत्साहवर्धक उत्पादनांचे लाँचिंग करणार आहे. त्या बळावर सोनालिका तिची 'संशोधन आणि विकास' क्षमता अधिक बळकट करण्यास सज्ज झाली आहे. त्यातून भविष्यातील विकासाला चालना देण्यासाठी अत्याधुनिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतील. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, "आमच्या महत्त्वपूर्ण अशा या ३० व्या वर्षात आमचा 'जीतने का दम' खऱ्या अर्थाने साकार झाला आहे, आम्ही वितरित केलेला प्रत्येक ट्रॅक्टर शेतकऱ्यांना सक्षम करण्याची आमची जिद्द आणि समाधान न मानण्याच्या आमच्या वृत्तीचे प्रतीक आहे, कारण उत्कृष्टतेच्या शोधात आम्ही नेहमीच उत्सुक असतो. आमच्या 'शेतकरी प्रथम' या तत्त्वज्ञानाशी एकनिष्ठ राहून आणि आर्थिक वर्ष २०२६ मधील दमदार उत्पादन लाँचच्या जोरावर आम्ही आमच्या संशोधन आणि विकास क्षमता अधिक मजबूत करत आहोत. त्यातून आमच्या शेतकरी समुदायाला आणखी प्रगत उपाययोजना देण्याचा आमचा मानस आहे. आमचे डीलर भागीदार, विविध विभागांतील टीम्स आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आमच्या शेतकऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. त्यांच्या विश्वासावरच आमचे सर्व कार्य आधारलेले आहे.

# Airtel दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

Bharti Airtel, जगातील ग्राहकसंख्येनुसार दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी टेलिकॉम ऑपरेटर आणि भारतातील अग्रगण्य दूरसंचार सेवा प्रदाता, यांनी आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत ६५० दशलक्ष ग्राहकसंख्या ओलांडली आहे. GSMA Intelligence च्या माहितीनुसार, Bharti Airtel ही मोबाईल ग्राहकसंख्येनुसार जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर आहे, आणि तिचे कार्य भारत व आफ्रिका या प्रदेशांमध्ये विस्तारलेले आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याबद्दल बोलताना, Gopal Vittal, एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरमन, Bharti Airtel, म्हणाले: "६५० दशलक्ष ग्राहकांचा टप्पा गाठून जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकाची ऑपरेटर होणे ही आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे, ज्यामुळे आम्ही दररोज आमच्या ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करतो. याच कारणामुळे आम्ही अत्याधुनिक




तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करतो, ज्यामुळे केवळ कनेक्टिव्हिटीच नव्हे तर सुरक्षित नेटवर्कही प्रदान करता येईल. आमचे ध्येय स्पष्ट आहे: जसे आम्ही आमची उपस्थिती अधिक मजबूत आणि विस्तृत करतो, तसे आम्ही नवकल्पना, विश्वासार्हता आणि ग्राहक अनुभव यामध्ये नवे मापदंड स्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहू, जेणेकरून प्रत्येक ग्राहक संवाद हा विश्वास निर्माण करण्याची आणि मूल्य देण्याची संधी ठरेल." मोबाईल ग्राहकसंख्येनुसार दुसऱ्या क्रमांकाची टेलिकॉम ऑपरेटर म्हणून Airtel ची ही कामगिरी त्यांच्या जागतिक स्तरावरील सातत्यपूर्ण प्रगतीचे द्योतक आहे. कंपनीचे कार्य भारत आणि आफ्रिका या प्रदेशांमध्ये विस्तारलेले असून, त्यांच्या कार्यक्षेत्रातील बाजारपेठांमध्ये वाढत्या डिजिटल सेवा आणि पायाभूत सुविधा क्षमतांच्या पोर्टफोलिओच्या बळावर ते समर्थित आहे: ३६८ दशलक्षाहून अधिक मोबाईल ग्राहकांना सेवा देत, Bharti Airtel ही 5G Plus सेवा सुरू करणारी पहिली कंपनी ठरली असून, या सेवांवर आधारित एकत्रित डिजिटल परिसंस्था उभारण्यात आली आहे, ज्यामध्ये Xstream AirFiber (FWA) आणि एकात्मिक IPTV सेवा यांचा समावेश आहे. Airtel सध्या १३ दशलक्षाहून अधिक घरांना उच्च-गती इंटरनेट सेवा आणि १५ दशलक्षाहून अधिक ग्राहकांना डिजिटल टीव्ही सेवा पुरवत आहे. ही "ग्राहक-केंद्रित" नवकल्पना जगातील पहिल्या नेटवर्क-आधारित AI स्पॅम संरक्षण उपायाने समर्थित आहे. Airtel Business विभाग एंटरप्राइझ ग्राहकांसाठी अत्यावश्यक (mission-critical) उपाय प्रदान करतो. यामध्ये Airtel IQ, सायबरसुरक्षा, SD-WAN, क्लाउड, मॅनेज्ड सर्व्हिसेस आणि IoT यांसह सुरक्षित कनेक्टिव्हिटीचा समावेश आहे. या सेवा ४,००,००० किमीहून अधिक सबसी फायबर नेटवर्क आणि Nxtra चे पर्यावरणपूरक डेटा सेंटर्स यांच्या बळावर चालतात, जे देशातील वाढत्या AI आणि डिजिटल वर्कलोड्सना शाश्वत पद्धतीने समर्थन देतात.

# रक्तदान श्रेष्ठदान हे मानवतेचे सर्वोच्च प्रतीक : वैभवी सोळंकी

पुणे : (स. गांवकरी)

'रक्तदान श्रेष्ठदान' हे मानवतेचे सर्वात मोठे प्रतीक असून, ते एखाद्याला नवजीवन देऊ शकते, असे प्रतिपादन किडझ किंगडम प्री-प्रायमरी स्कूलच्या प्राचार्या वैभवी सोळंकी यांनी केले. महावीर जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया आणि गंभीर आजारांमध्ये रक्ताची नितांत गरज भासते. रक्तदान हे निःस्वार्थपणे केलेले कार्य असून, एका रक्तदात्याच्या दानामुळे एकाच वेळी तीन रुग्णांचे प्राण वाचू शकतात. तसेच, रक्तदानामुळे दात्याच्या आरोग्यालाही फायदे मिळतात, असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या की, मानवी शरीरात निर्माण होणारे रक्त कृत्रिमरित्या तयार करता येत नाही. त्यामुळे रक्ताची कमतरता




भरून काढण्यासाठी रक्तदान हाच एकमेव पर्याय आहे. 'रक्तदान म्हणजे केवळ रक्ताचे दान नव्हे, तर ते जीवनदान आहे,' असे त्यांनी नमूद केले. दर दोन सेकंदाला कुणा ना कुणाला रक्ताची गरज भासते. रस्ते अपघात, प्रसूती, शस्त्रक्रिया तसेच थॅलेसेमिया व कर्करोगासारख्या गंभीर आजारांमध्ये रुग्णांना वाचवण्यासाठी रक्त अत्यावश्यक असते, असेही त्यांनी सांगितले.

# चार जिल्हा परिषद शाळांमध्ये 'ग्रीन स्कूल' प्रकल्पाचे लोकार्पण

पुणे : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शाळांना पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर निधीतून आणि सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हज यांच्या माध्यमातून चार जिल्हा परिषद शाळांमध्ये ग्रीन स्कूल प्रकल्पाचे लोकार्पण नुकतेच झाले. खेड तालुक्यातील बिरदवाडी, देशमुखवाडी, तोरणे आणि रानमळा (कडूस) येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून शाळांमध्ये पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा निर्माण करून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत आणि शाश्वत जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न




करण्यात आला आहे. या ग्रीन स्कूल प्रकल्पांतर्गत शाळांमध्ये सोलर ऊर्जा प्रणाली, रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था, ओल्या कचऱ्यासाठी खत निर्मिती यंत्र, तसेच इनडोअर व आउटडोअर वृक्षारोपण करण्यात आले आहे. पाणी संवर्धनासाठी शाळांमध्ये लो-फ्लो वॉटर टॅप्स बसविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वर्षभर पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यासाठी ग्रीन कॅलेंडर शाळांना देण्यात आले आहे. शाळेतील सर्व हरित उपक्रमांची देखभाल व अंमलबजावणी करण्यासाठी विद्यार्थ्यांची 'ग्रीन आर्मी' तयार आहे. विद्यार्थ्यांना विज्ञान व पर्यावरण विषयाची आवड निर्माण व्हावी यासाठी सायन्स पार्क भेट, तसेच पर्यावरण संवर्धन, अग्निसुरक्षा आणि जैवविविधता ओळख या विषयांवर मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हजच्या अपूर्वा कुलकर्णी म्हणाल्या, "पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आमची संस्था नेहमीच पुढाकार घेत असते. शासकीय शाळांना हरित शाळांमध्ये रूपांतरित करण्याच्या उद्देशाने या प्रकल्पाची सुरुवात झाली.


टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर निधीच्या सहकार्याने आतापर्यंत ८ शाळांमध्ये ग्रीन स्कूल प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत." या प्रकल्पामुळे शाळांमध्ये नैसर्गिक ऊर्जेचा वापर वाढेल, पावसाचे पाणी जमिनीत मुरल्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होईल, तसेच लो-फ्लो टॅप्समुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल. वृक्षारोपणामुळे शाळा परिसर अधिक हरित होऊन विद्यार्थ्यांना स्वच्छ व पर्यावरणपूरक वातावरण मिळेल, असे अमोल उंबरजे यांनी सांगितले.

शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता वाढेल आणि उपलब्ध सुविधांचा योग्य वापर केला जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

तसेच चारही गावांतील ग्रामस्थ व पालकांनी टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स आणि सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हज यांच्या उपक्रमाचे कौतुक करत आभार मानले. या प्रकल्पाचे समन्वयक म्हणून प्रियांका बुरंगे, सुमित कापसे आणि शालीन पालेकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# सूर्यनमस्कार करताना या चुका करू नका, फायदा होणार नाही

सूर्य नमस्कार बघणे खूप सोपं आहे परंतु या प्रक्रियेत काहीही चूक झाली तर या पासून फायदा मिळत नाही. सूर्य नमस्कारात 12 प्रकारचे आसन असतात. ज्यांना लक्षात ठेवणं सुरवातीला सहज नाही. हे आसन करताना चुका होणं सहज आहे. परंतु जर नियमानं सूर्य नमस्काराचा सराव केला आहे तर चुका होण्याची शक्यता कमी होते. चला जाणून घेऊ या की सूर्य नमस्कार करताना कोणत्या चुका करू नये.



**घाई करणे-** बऱ्याच लोकांची सवय असते ते लवकर लवकर सूर्य नमस्कार करतात. अशा परिस्थितीत चुका होणं स्वाभाविक आहे.हे करताना आपल्याला प्रत्येक आसनाला समान वेळ द्यावं लागेल.तसेच आपल्या श्वासावर देखील लक्ष द्यावे लागेल. जर आपण असं करत नाही तर आपले आसन योग्य प्रकारे होणार नाही आणि पूर्ण देखील मानले जाणार नाही. या मुळे आपल्याला त्याचा फायदा मिळणार नाही.

**दोन आसन एकत्र करणे-** बऱ्याच वेळा लोक 12 आसनाचे नाव ऐकूनच आळस करतात. अशा स्थितीत ते घाईघाईने दोन आसने एकत्र करतात. ते कोब्रापोझ आणि अपवॉर्ड डॉग फेसिंग पोझ एकत्र करतात. जर आपल्याला शरीराला सामर्थ्य मिळवू इच्छिता तर हे महत्त्वाचे आहे की आपण कोब्रा पोझ वेगळी आणि योग्य रित्या करावी. प्रत्येक आसन करण्याचे आपापले फायदे आहे.म्हणून ते योग्यरीत्या करावं.

**आसन पूर्ण करा-** सूर्य नमस्कारा नंतर कोणते काम करावयाचे आहे त्यासाठी आसन अर्धवट सोडू नका. त्या पेक्षा आसन करूच नका. जेव्हा आपल्याकडे वेळ असेल तेव्हाच आसने करावी. अर्धवट केलेल्या सूर्य नमस्काराने आपल्याला फायदा न होता दुष्परिणाम भोगावे लागतील. जी पद्धत आहे त्यानुसारच आणि वेळेवर आसन करावं.

**क्रमात बदल करू नका-** आपल्या शिक्षकांनी आसनाचे जे क्रम सांगितले आहे त्यानुसारच आसन करावं. जर आपण स्वतःहून काही बदल केले तर त्यामुळे आपल्याला शारीरिक त्रास होऊ शकतात. म्हणून 12 आसनाची जी प्रक्रिया आहे त्याला व्यवस्थितरित्या पूर्ण करा. कोणतेही आसन मधे सोडू नका. आणि जर चुकून विसरला असाल तर पुन्हा करायला वळू नका.

# निरोगी राहण्यासाठी गरम पाणी प्या, फायदे जाणून घेऊ या..!

निरोगी राहण्यासाठी काही लोक बरेच उपाय अवलंबवतात. निरोगी राहण्यासाठी आपण गरम पाण्याचे सेवन करावं. हे प्यायल्यानं आरोग्या सुधारते. गरम पाण्याचे सेवन करून अनेक प्रकारचे आजाराला टाळता येऊ शकत. सामान्यतः लोक हिवाळ्यात गरम पाणी पितात. परंतु गरम पाण्याचे सेवन प्रत्येक हंगामात फायदेशीर आहे. चला तर मग ह्यांचे फायदे जाणून घेऊ या.

**वजन नियंत्रणात राहत-** गरम पाण्याचे सेवन केल्यानं वजन नियंत्रणात राहत. ज्यांना आपले वजन कमी करायचे आहे त्यांनी गरम पाण्यात लिंबू आणि मध मिसळून त्याचे सेवन करावं. या मिश्रणाचं सेवन केल्यानं वजन कमी होत.

**त्वचेसाठी फायदेशीर-** ह्यांचे सेवन केल्याने त्वचेसाठी फायदेशीर आहे. या मुळे त्वचा चांगली होते सरत्या वयात सौंदर्य देखील अदृश्य होतो. असं होऊ नये या साठी दररोज गरम पाण्याचं सेवन करावं.

**केसांसाठी फायदेशीर-** दररोज गरम पाणी प्यायल्यानं केसांची वाढ चांगली होते. केस बळकट होतात आणि केसांची गळती थांबते.



**सर्दी-पडसं पासून संरक्षण-** गरम पाण्याच्या सेवनाने सर्दी पडसं सारख्या समस्या नाहीश्या होतात. कोरोना कालावधीत देखील गरम पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो.

**शरीरातील घाण दूर होते-** दररोज गरम पाणी प्यायल्यानं शरीरातील घाण दूर होते निरोगी राहण्यासाठी शरीरातील घाण निघणं खूप महत्त्वाचे आहे. या मुळे शरीर निरोगी राहत.

**पचन प्रणाली सुरळीत होते-** पचन प्रणाली ला सुरळीत ठेवण्यासाठी गरम पाण्याचे सेवन करावं.सकाळी गरम पाणी प्यायल्यानं पोट चांगल्या प्रकारे स्वच्छ होत आणि बद्ध कोष्ठतेचा त्रास होत नाही. जेवण्याच्या 30 मिनिटा नंतर गरम पाण्याचे सेवन केल्यानं अन्न लवकर पचत.

**सांधे दुखी चा त्रास दूर होतो-** गरम पाण्याचे सेवन केल्यानं सांधे दुखीचा त्रास नाहीसा होतो. गरम पाण्याचे सेवन स्नायूंसाठी देखील फायदेशीर आहे.

# वास्तुशास्त्रानुसार दुकानाची दिशा कशी असावी..



**दुकान** अथवा व्यवसायावर व्यक्ती व त्याच्या परिवाराचा उदरनिर्वाह चालत असतो. व्यक्तीच्या व्यापार व्यवसायात चांगली वृद्धी होत असेल तर तो व त्याला परिवार सुखी असतो. वास्तुशास्त्रात दुकानासंदर्भात विशेष सांगण्यात आले आहेत. दुकान व दुकानाची दिशा यांच्याबाबत विशेष नियम त्यात सांगितले आहेत. ती नियम पुढील प्रमाणे-

- पूर्व दिशेला प्रवेशद्वार असलेले दुकान शुभ मानले जाते.
- उत्तर दिशेला प्रवेशद्वार असलेले दुकानात मालकाच्या इच्छेनुसार व्यवसायात वृद्धी होते.
- नैरृत्य अथवा वायव्य दिशेला प्रवेशद्वार असलेल्या दुकानात 10 ते 15 वर्षातच भरभराटी येते. मात्र त्यानंतर त्याला उतरती कडा येते.
- दक्षिण दिशेला असलेले दुकान जर सोने-चांदी, सौंदर्य प्रसाधने व महिलांच्या उपयोगी वस्तूंचे असेल तर त्याच्या मालकासाठी लाभदायी असते. तसेच काळ्या रंगाच्या वस्तूंची ही विक्री देखील चांगली होते व व्यापारात वृद्धी होते.
- पूर्व दिशेला प्रवेशद्वार असलेले दुकानात कपडे, पुस्तके, स्टेशनरी, सुशोभीकरणाच्या वस्तू व वाहन विक्री होत असेल तर त्या दुकानात देखील लक्ष्मीचा वास असतो.
- पश्चिममुखी असलेल्या दुकानात शेती उपयोगी साहित्य, बी-बियाणे, कीटकनाशके आदी वस्तूच्या विक्री केल्या जात असतील तर त्याच्या व्यवसायात चांगल्या प्रकारे फायदा होतो.
- दुकानाच्या मालकाने उत्तर दिशेला तोंड करून बसले पाहिजे.
- दुकानातील माल ठेवायचे कपाट हे दक्षिण दिशेला ठेवले पाहिजे.
- पाण्याचा माठ किंवा वाटर कूलर हे ईशान्य दिशेच्या कोपऱ्यात ठेवले पाहिजे.
- दुकानाला पायऱ्या व ओटा हा असायलाच पाहिजे.
- दुकानातील पैशांचा गल्ला हा दक्षिण दिशेच्या भिंतीला पाहिजे व हिशोबाचा टेबल हा आयता कृती आकाराचा पाहिजे.
- दुकानातील जुनाट झालेला माल त्वरित विकला पाहिजे.
- दुकानातील सामान ठेवण्यासाठी तयार केलेले कपाट हे शक्यतो लागडाचे पाहिजे.
- दुकानातील देव घर हे उत्तर-पूर्व दिशेला ठेवले गेले पाहिजे व तेथे दररोज दिवा व उदबत्ती लावली पाहिजे.

# तुम्हाला एलपीजी गॅस सिलिंडर मिळणार नाही?

# बायोमेट्रिक ईकेवायसीची ऑनलाइन प्रोसेस जाणून घ्या

तुम्ही अजूनहीएलपीजी गॅस सिलिंडरचे ईकेवायसी केले नसेल तर ही बातमी आधी वाचा. कारण, तुमचेएलपीजी गॅस सिलिंडर बंद होऊ शकते. सरकारने सर्व घरगुती गॅस ग्राहकांना बायोमेट्रिक आधार व्हेरिफिकेशन म्हणजेच ई-केवायसी करणे अनिवार्य केले आहे. छद्मगॅसचा काळाबाजार थांबवण्यासाठी योग्य व्यक्तीपर्यंत थेट पोहोचण्याच्या उद्देशाने ही सबसिडी दिली जात आहे. चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.




तुम्हालाएलपीजी गॅस सिलिंडर मिळणार नाही. हो. केंद्र सरकारने गॅस ग्राहकांना बायोमेट्रिक आधार व्हेरिफिकेशन म्हणजेच ई-केवायसी करणे अनिवार्य केले आहे आता तुमचा प्रश्न हाच असेल की, 'आम्ही ई-केवायसी करण्यासाठी गॅस एजन्सीमध्ये जावे का?' तर काहीही गरज नाही. तुम्ही घरी बसून गॅसचे बायोमेट्रिक आधार व्हेरिफिकेशन म्हणजेच ई-केवायसी करू शकतात.

पेट्रोलियम मंत्रालयाने 'एक्स' वर पोस्ट केले आहे की, आता सर्व घरगुती गॅस ग्राहकांना बायोमेट्रिक आधार व्हेरिफिकेशन म्हणजेच ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

चला तर मग ई-केवायसी च्या विविध पद्धती कोणत्या आहेत, याविषयीची माहिती पुढे विस्ताराने जाणून घेऊया.

**ई-केवायसी च्या विविध पद्धती**

गॅस कंपन्यांनी (एचपी, इंडेन, भारत गॅस) ग्राहकांसाठी ई-केवायसी च्या तीन प्रमुख पद्धती उपलब्ध करून दिल्या आहेत.

**1) बायोमेट्रिक पद्धत**

ही पद्धत अशा लोकांसाठी उत्तम आहे ज्यांचा मोबाईल नंबर आधारशी लिंक नाही किंवा ज्यांना तंत्रज्ञान वापरता येत नाही.

प्रक्रियाः गॅस एजन्सीवर जाऊन तुमचा ग्राहक क्रमांक (कंस्यूमर आयडी) द्यावा लागतो. त्यानंतर तिथे असलेल्या बायोमेट्रिक उपकरणावर (फिंगरप्रिंट स्कैनर) तुमचा अंगठा लावून तुमची ओळख पटवली जाते. ही माहिती त्वरित आधार डेटाबेसशी जुळवली जाते आणि ई-केवायसी यशस्वी होते.

**2) फेस ऑथेंटिकेशन**

जर तुम्हाला गॅस एजन्सीवर रांगेत उभे राहायचे नसेल, तर तुम्ही स्मार्टफोनच्या मदतीने घरी बसून ई-केवायसी करू शकता.

पायऱ्याः गुगल प्ले स्टोअरवरून 'आधार फेसआरडी' हे अधिकृत अॅप डाऊनलोड करा.

त्यानंतर तुमच्या गॅस कंपनीचे अॅप (उदा. इंडियनऑइल वन, हॅलो बीपीसीएल, किंवा एचपी पे) डाऊनलोड करा.

अॅपमध्ये लॉगिन करून 'ई-केवायसी' पर्यायावर क्लिक करा.

मोबाईलचा सेल्फी कॅमेरा वापरून तुमचा चेहरा स्कॅन करा. तुमचा चेहरा आधारमधील फोटोशी जुळल्यास प्रक्रिया पूर्ण होईल.

**3) ओटीपी आधारित पद्धत (ओटीपी बेस्ड मेथड)**

काही कंपन्यांच्या पोर्टलवर मोबाईल ओटीपी द्वारे प्राथमिक पडताळणी केली जाते. मात्र, पूर्ण सबसिडीसाठी सध्या बायोमेट्रिक किंवा फेस स्कॅन अधिक प्रभावी मानले जात आहे.

**बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन का अनिवार्य करण्यात आले?**

अलीकडेच घरगुती गॅसच्या किमतीत प्रति सिलिंडर 60 रुपयांची वाढ झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मध्यपूर्वेत सुरू असलेले युद्ध, ज्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेल आणि वायूचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. अशा परिस्थितीत सरकार बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन अनिवार्य करत आहे जेणेकरून गॅसचा काळाबाजार रोखला जाईल.

# कॉर्न कटलेट

**साहित्य-** ४-५ उकडलेले बटाटे, १ वाटी उकडलेले कॉर्न, १ चिरलेला कांदा, २ बारीक चिरलेल्या मिरच्या, १ टेबलस्पून चाट मसाला, अर्धी वाटी कोथिंबीर, १ वाटी ब्रेड क्रम्ब्स, एक वाटी मैदा किंवा कॉर्नफ्लॉवर पेस्ट.

**कृती-** बटाटे कुस्करून घ्या. त्यात उकडलेले कॉर्न अख्खे किंवा ठेचून टाका. कांदा, मिरची, चाट मसाला, कोथिंबीर आणि मीठ घाला. आवडीनुसार आकार द्या. कॉर्नफ्लॉवरच्या पेस्टमध्ये बुडवून वरून ब्रेडक्रम्ब्स लावा. पॅनमध्ये तेल टाकून शॅलो फ्राय करा. टोमॅटो केचप किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# पिंपलचा त्रास दूर करण्यासाठी असा करा 'डाळिंबा'चा वापर!

आजकाल तरुणींना ॲक्नेची समस्या वारंवार सतावते. त्वचा लालसर होणे, पिंपल्सचे डाग राहणे यामुळे सौंदर्य अधिकच बिघडते. अनेकजणींना असे वाटते की चेहऱ्याची स्वच्छता न राखल्यामुळे ॲक्ने येतात. परंतु, हे चुकीचे आहे. खरंतर ॲक्ने येण्याची कारणे वेगळी आहेत. हार्मोन्सचे असंतुलन, ताण, सिबमची निर्मिती, बंद पोर्स, बॅक्टरीया यामुळे ॲक्नेची समस्या उद्भवते. या सगळ्या समस्या असतील आणि तुम्ही कितीही वेळा चेहरा धुतला तरी पिंपल्स येतात.

ॲक्नेवर अनेक घरगुती उपाय आहेत. परंतु, पिंपल्स आणि त्यामुळे होणारे त्वचेचे त्रास दूर करण्यासाठी डाळींब उपयुक्त ठरते. म्हणजेच डाळिंब हेल्दी असण्याबरोबर सौंदर्यवर्धक देखील आहे. जाणून घेऊया पिंपल्स हटवण्यासाठी डाळिंबाचा कसा उपयोग होतो?



**जळजळ कमी होते:** डाळींबामध्ये अँटी इन्फ्लामेटरी गुणधर्म असल्याने त्याचा परिणाम अॅक्नेच्या वाढीवर होतो. आणि पिंपल्स येण्याची समस्या आटोक्यात येते.

**पिंपल्सची वाढ कमी होते:** डाळिंबाचा गर त्वचेवर लावल्यास पिंपल्सवर परिणामकारक ठरतो. त्यामुळे कोणताही दुष्परिणाम होत नाही. तसंच त्यामुळे पिंपल्समुळे त्वचा लालसर होण्याची समस्या देखील दूर होते.

**बॅक्टरीयाची वाढ नियंत्रणात येते:** डाळिंबाचा गर चेहऱ्यावर लावल्याने ॲक्ने येण्यास कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टरीयांची वाढ देखील नियंत्रणात येते.

**डाळिंबाचा वापर नेमका कसा करावा?**

डाळींब हे चवीला चांगले असल्याने तुम्ही ते सोलून खाऊन शकता किंवा ज्यूस घेऊ शकता. डाळिंबाची साल आणि रस दोन्ही पिंपल्स कमी करण्यासाठी उपयुक्त ठरतं. डाळिंबाची साल सुकवून त्याची पावडर करा. त्यात मध घालून पेस्ट बनवा आणि चेहऱ्यावर लावा. डाळिंबाचा रस चेहऱ्यावर लावल्याने देखील सारखाच फायदा होतो.

# साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स

**घरच्या** घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स आहेत, त्यामुळे दिवसाच्या थकव्यानंतर त्वचाला स्वच्छ करणे आवश्यक असते. दिवसाच्या थकव्यानंतर त्वचाला स्वच्छ व पुनरूजीवीत करणे आवश्यक असते. त्यासाठी घरच्या घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स

- ही काळजी घ्या, आणि सतेज कांती मिळवा
- चेहरा धुण्यासाठी तुमच्या त्वचेनुसार योग्य ते फेस वॉश अथवा क्लिंजिग वापरा.
- चेहऱ्यावरील छिद्र बुजवण्यासाठी क्लिंजिंग मिल्कच्या सहाय्याने चेहरा साफ करा.
- चेहऱ्याच्या त्वचेला सोसावेल इतकी गरम वाफ घ्या.
- चेहरा थंड कऱ्यासाठी बफार्ने मसाज करा.
- त्यानंतर फेस स्क्रबरने ८-१० मिनिटे चेहरा साफ करा.
- चेहरा सुकल्यानंतर चेहऱ्याला मध लावा जेणेकरून त्वचा उजळ होण्यास मदत होईल
- चेहरा स्वच्छ धुवून आवडीनुसार फेस पॅक लावा.
- हळूहळू चेहरा सुकू द्या. सुकल्यानंतर त्याला टोनर लावा.
- चेहऱ्याला तजेला येण्यासाठी मॉईस्चराईजर लावा.



# चेहऱ्याची त्वचा मुलायम आणि कोमल होण्यासाठी टोमॅटो स्क्रब फायदेशीर

**सध्या** बाहेक कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. अंगातून घामाच्या धारा लागत आहेत. घामामुळे त्वचेसंबंधी आजारही होतात. तसेच चेहरा काळवंटतो. आपला चेहरा चांगला फ्रेश आणि चकाकी येण्यासाठी टॉमेटोचा उपयोग चांगला होतो.

तेलकट त्वचा, लाल, खाज, काळे डाग आदी संबंधीत जे आजार असतील ते कमी होण्यास मदत होईल.



चेहऱ्याची त्वचा मुलायम आणि कोमल होण्यासाठी टॉमेटो सिपचा उपयोग करु शकता.

# काही सोप्या उपयुक्त किचन टिप्स

घरात पाहुणे येणार आहे असं समजल्यावर प्रत्येक स्त्री त्यापूर्वीची तयारी करायला लागते. जेणे करून वेळेवर तिचा गोंधळ होऊ नये .तरी ही घाई आणि गोंधळ होतो. पूर्व तयारी केली नाही तर तिचा संपूर्ण वेळ स्वयंपाकघरातच जातो आणि त्यांना पाहुण्यांसमवेत वेळच घालवता येत नाही. त्या साठी आम्ही आपल्याला स्वयंपाकघरातील काही सोप्या टिप्स सांगत आहोत. ज्यांना अवलंबवून आपल्याला काहीच त्रास होणार नाही आणि आपण आपला संपूर्ण वेळ स्वयंपाकघरात न घालवता पाहुण्यां समवेत घालू शकाल.

- पाहुण्यांसाठी पूर्वीपासून सफरचंद कापून ठेवत असाल तर त्यामध्ये थोडं लिंबू पिळून द्या. असं केल्यानं सफरचंदाचा रंग बदलत नाही.
- दररोज सकाळी कणीक मळताना संध्याकाळ साठी देखील कणीक मळून ठेवा.त्या कणकेला तेलाचा हात लावून ठेवा. या मुळे कणीक कोरडी होणार नाही आणि पोळ्यादेखील मऊ बनतील.
- घरात नान बनवताना कणीक आधीच मळून फ्रीज मध्ये ठेवू शकता. कणकेला तेल लावून ठेवा ही मळलेली कणीक सुमारे 2 ते ३ दिवस चांगली राहील.
- नान बनवताना चव बदलण्यासाठी त्याच्या एका भागात बारीक चिरलेले लसूण मिसळा, गार्लिक नान तयार होईल.
- नान बनविण्यासाठी मळलेल्या या कणकेपासून आपण स्टफ्ड नान देखील बनवू शकता.
- कच्च्या कैरी किंवा इतर हंगामी फळांचे स्क्वॅश बनवून ठेवा.
- कस्टर्ड किंवा इतर गोड पदार्थांमध्ये वापरली जाणारी जेली देखील पूर्वीपासून बनवून ठेवू शकता. लक्षात ठेवा ही जेली केवळ 3 दिवस वापरू शकता.
- फ्रूट कस्टर्ड बनवून फ्रीजमध्ये ठेवा हे सुमारे 3 दिवस वापरू शकता.
- गोडधोड करण्यासाठी श्रीखंड बनवू इच्छिता तर हे बनवून फ्रीज मध्ये साठवून ठेवा आणि 3 दिवस वापरा.
- केक देखील पूर्वीपासून बनवून ठेवू शकता.लक्षात ठेवा की केक चांगल्या प्रकारे बॅक झालेला असावा. चांगल्या प्रकारे बॅक झालेला केक तीन ते चार दिवसां पर्यंत खराब होत नाही.



# झोपण्यापूर्वी दूध पिण्याचे 'हे' आहेत फायदे

**दूध** हा आरोग्यासाठी अतिशय महत्त्वाचा घटक आहे. लहान बाळासाठी पूर्णान्न असलेले दूध आपण वेगवेगळ्या मोठे झालो तरीही पितो. काहींना दूध अजिबात आवडत नाही तर काहींना खूप जास्त आवडते. पण कॅल्शियम आणि प्रथिनांचा मोठा स्त्रोत असलेले दूध आहारात असायलाच हवे. आवडत नसले तरीही औषध म्हणून का होईना दूध प्यायला हवे असे अनेक डॉक्टरही सांगतातपण दुधात काबोर्हायड्रेट्स, फॅट्सबरोबरच ए, बी-१, बी-२, बी-३, बी-५, बी-६, बी-१२, सी, इ, के, डी ही जीवनसत्वेसुध्दा मुबलक असतात. याशिवाय आयर्न, मॅग्नेशियम, मँगेनीज, तांबे, पोटॅशियम, सेलेनियम, झिंक, फॉस्फरस ही खनिजे उत्तम प्रमाणात उपलब्ध असतात. एक कप शुध्द दूध प्यायल्यावर आपल्या शरीराला साधारणतः १४० कॅलरीज मिळतात. सुदृढ प्रकृतीसाठी, रोगप्रतिकारक शक्ती उत्तम राहण्यासाठी, हाडे बळकट होण्यासाठी आणि मुख्य म्हणजे आरोग्य उत्तम राहायला दुधासारखा दसरा पर्याय नाही. आता हे दूध रात्री प्यावे की सकाळी, गार प्यावे की गरम, त्यामध्ये काही घालावे की न घालता प्यावे असे अनेक प्रश्न आपल्यातील अनेकांना पडतात. त्याबाबत बरीच मतमतांतरेही आहेत. पण अविनव वर्मा यांच्या म्हणण्यानुसार रात्री झोपण्यापूर्वी दूध प्यायले तर ते आरोग्यासाठी अधिक फायद्याचे असते. शरीराचे कार्य सुरळीत व्हायचे असले तर रात्री झोपताना दूध प्यायलेले चांगले असते. तसेच कोमट दूध प्यायल्याने शांत झोप लागण्यास मदत होते. पाहूयात रात्री झोपताना दूध पिण्याचे फायदे...



**हृदयरोगाची शक्यता कमी**

दूधामध्ये असणाऱ्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. रक्तदाब नियंत्रित राहील्यास हृदयावर ताण येत नाही आणि हृदयाशी संबंधित तक्रारी उद्भवण्यापासून आपली सुटका होऊ शकते. त्यामुळे हृदयाचे कार्य चांगले रहावे यासाठी झोपताना दूध प्यायलेले फायदेशीर ठरते.

**वजन कमी करण्यास उपयुक्त**

रात्री झोपताना दूध प्यायले तर तुमचे पोट भरलेले राहते आणि तुम्हाला लवकर भूक लागत नाही. त्यामुळे तुम्हाला वजन कमी करायचे असल्यास रात्री झोपताना दूध पिणे हा उत्तम पर्याय ठरु शकतो. प्रक्रिया केलेले दूध पिणे जास्त चांगले. मात्र झोपताना दूध पित असाल तर ते एक ग्लासहून जास्त नसेल याची काळजी घ्या.

**पुरेशी झोप येण्यास उपयुक्त**

कोमट दूध प्यायल्याने शरीरातील स्नायू शिथिल होण्यास मदत होते. स्नायू शिथिल झाले की शांत आणि चांगली झोप लागते. त्यामुळे झोपण्यापूर्वी कोमट दूध पिणे गाढ झोप लागण्यासाठी उपयुक्त असते. त्यामुळे तुम्हाला शांत झोप येत नसेल तर दूध प्या, नक्कीच फायदा होईल.

**प्रतिकारशक्ती वाढण्यास मदतशीर**

आयुवेर्दाप्रमाणे दूधामध्ये हळद किंवा आले टाकून प्यायल्यास त्यामुळे प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. विविध कारणांनी होणाऱ्या व्हायरल इन्फेक्शनपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी हे उपयोगी ठरते.

शक्यतो हे दूध कोमट असेल याची काळजी घ्यावी. तसेच आपण पित असलेले दूध कमी फॅटस असलेले असेल असे पहावे.

# बटाट्याचा रस पिण्याचे ६ फायदे, जाणून घ्या

उकळलेले किंवा कच्चे बटाटे आपण अनेक चटपटीत पदार्थ बनविण्यात वापरले असतील पण कधी आपण बटाट्याचा रस प्यायला आहात का? जर नसेल प्यायला तर प्यायला सुरु करून द्या कारण याने आपल्याला लाभतील आरोग्याचे फायदे. सध्या जाणून घ्या ६ फायदे-



- कच्च्या बटाट्याचा रस पाण्यासोबत रोज अर्धा कप प्या. हा रस रिकाम्या पोटी प्यावा. याने गॅसची तक्रार होणार नाही.
- शोधाप्रमाणे कच्च्या बटाट्यांचा रस कर्करोग, उच्च रक्तदाब आणि किडनीव्यतिरिक्त अनेक प्रकाराच्या आरोग्य समस्यांपासून बचाव करतं.
- जर आपण मधुमेह रोगी असाल तर हा रस आपल्यासाठी फायदेशीर आहेत. रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यात हा रस प्रभावी आहे.
- हा रस आपली रोग प्रतिकारशक्ती वाढवेलच यासोबतच लिव्हरसंबंधी समस्यांपासून सुटकारा मिळवण्यात मदत करेल.
- हा रस नियमित सेवन केल्याने त्वचेसंबंधी समस्या दूर होईल. हा रस त्वचेला पोषण देऊन तेजस्वी दिसण्यात मदत करेल. त्वचेवर हा रस लावल्याने पिंपल्सची समस्या दूर होईल.
- हा रस सेवन केल्याने शरीरातून सर्व हानिकारक तत्त्व काढण्यात मदत मिळेल आणि शरीरातील सर्व अंगांची सफाई होईल.
- एवढंच नव्हे तर हृदयवाहिनी संबंधी समस्यांमध्येही बटाट्याचा रस फायदेशीर आहे.